बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन   डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ३५ | बुधवार, दि.७ ऑगस्ट २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# लाचखोर लोकप्रतिनिधींच्या निलबंनाचा अहवाल नगरविकास मंत्रालयात पडून



**गोंदिया,**–सडक अर्जुनी नगरपंचायतचे अध्यक्ष, प्रभारी मुख्याधिकारी तथा नायब तहसीलदार, सभापती, नगरसेवक, नगरसेविकेचा पती, एक व्यापारी अशा सहा जणांना १४ मे २०२४ रोजी १ लाख ८२ हजार रुपयांची लाच घेताना अटक करून गुन्हा नोंद करण्यात आला. १५ मे रोजी सर्व आरोपींना न्यायालयात सादर करण्यात आले. दोन दिवसांची पोलिस कोठडी मिळाली. यानंतर न्यायालयीन कोठडी मिळाल्याने त्यांना भंडारा कारागृहात पाठविण्यात आले. येथे मुक्कामानंतर त्यांना ३० मे रोजी बेल मिळाली. नगराध्यक्ष, सभापती व नगरसेवक यांना निलंबन करण्याबाबदचा प्रस्ताव लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने राज्याच्या नगरविकास विभागाकडे पाठविला. मात्र अडीच महिने लोटूनही या प्रस्तावावर कारवाई झाली नसल्याने तिनही लाचखोर लोकप्रतिनिधी आजही सत्ता उपभोगत आहेत. या प्रकारामुळे कुठेतरी भ्रष्टाचाराला खतपाणी मिळत असल्याची चर्चा सुज्ञ नागरिकांमध्ये होत आहे.

तक्रारदारास नगरपंचायत सडक अर्जुनी दोन नाली बांधकाम च्या ई निविदा मंजूर झाल्या. कार्यारंभ आदेशाची मागणी केली असता तक्रारदारास नगराध्यक्ष तेजराम किसन मडावी (६६), नायब तहसीलदार तथा प्रभारी मुख्याधिकारी शरद विठ्ठल हलमारे यांनी निविदा रकमेच्या १५ टक्के लाच मागितली. तक्रारादारास लाच देण्याची इच्छा नसल्याने लाचलुचपत विभागाकडे तक्रार केली. तक्रारीनुसार पडताळणी करून १४ मे रोजी सापळा कारवाईदरम्यान नगराध्यक्ष मडावी, मुख्याधिकारी हलमारे, बांधकाम सभापती अश्लेष अंबादे, नगरसेवक महेंद्र वंजारी, नगरसेविकेचा पती जुबेर अलीम शेख, यांनी निविदा रक्कम १२,१५,६३४ रकमेवर १५ टक्क्यांप्रमाणे १ लाख ८२ हजार रुपये लाच मागितली. आरोपी नगराध्यक्ष मडावी यांनी लाचेची रक्कम आरोपी शुभम येरणेच्या दुकानात देण्यास सांगितले. दरम्यान आरोपींना लाच स्विकारताना रंगेहाथ पकडून डुग्गीपार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सर्व आरोपिंना प्रथम दोन दिवसाची पोलिस कोठडी व नंतर ३० मेपर्यंत न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली. आरोपींना बेल मिळाल्यानंतर आरोपी मुख्याधिकारी शरद हलमारेला तत्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले. आरोपी लोकप्रतिनिधी तेजराम मडावी, अश्लेष अंबादे, महेंद्र जयपाल वंजारी हे पदावर कार्यरत राहिल्यास जनसामान्यात शासनाची प्रतीमा मलीन होण्याची शक्यता असल्याने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ४२ (१) मधिल तरतुदी नुसार कोणताही पालिका सदस्य त्याचे कर्तव्य बजावित असताना गैरवर्तन केल्यास किंवा लज्जास्पद वर्तन केल्याबद्दल दोषी ठरला तर राज्य शासनाला स्वतः हुन किंवा नगरपालीकेच्या शिफारशीवरुन त्यास पदावरुन दुर करण्याची तरतूद आहे. कायद्यातील तरतुदीनुसार तिन्ही आरोपींना निलंबित करण्याचा प्रस्ताव स्थानिक लाच लुपत प्रतिबंधक विभागाने २२ मे रोजी राज्याच्या नगरविकास विभागाकडे पाठविला मात्र अद्यापही या प्रस्तावावर कारवाई झाली नसल्याने तिन्ही लोकप्रतिनिधी पदारुढ आहेत. राजकीय दबावात निर्णय घेण्यास दिरंगाई होत असल्याचे बोलले जाते.

**सर्व सहाही आरोपींना बेल मिळाली आहे. शासनाने आरोपी शरद हलमारेला निलंबित केले आहे. लोकप्रतिनिधी मडावी, अंबादे, वंजारी यांच्या निलंबनाचा प्रस्ताव नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे पाठविला आहे. कारवाई प्रक्रीयेत आहे.**

**अतुल तवाडे**
**पोलिस निरिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया**

## जिल्ह्यातील सर्व मतदार केंद्रावर प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

**गोंदिया:** १ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत मतदार याद्यांचा दुसरा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम घोषित झाला असून ६ ऑगस्ट २०२४ (मंगळवार) रोजी गोंदिया जिल्हयातील सर्व मतदान केंद्रावर प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी प्रजित नायर यांनी दिली आहे.सदर संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम अंतर्गत १० ऑगस्ट २०२४ (शनिवार) व ११ ऑगस्ट २०२४ (रविवार) आणि १७ ऑगस्ट २०२४ (शनिवार) व १८ ऑगस्ट २०२४ (रविवार) रोजी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. सबब संबंधित विशेष मोहिम अंतर्गत १८–१९ वयोगटातील मतदार, तृतीय पंथीय, देह व्यवसाय करणऱ्या स्त्रिया आणि दिव्यांग मतदार यांनी जास्तीत जास्त सहभागी होऊन आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# सात तालुक्यांनी आताच तोडला मागील वर्षीचा रेकॉर्ड

**सालेकसा तालुक्यातच कमी बरसला, ६४ टक्के पाऊस आताच बरसला**



**गोंदिया:–** १९ जुलैपासून संततधार बरसत असलेल्या पावसाने जिल्ह्याला पार धुवून काढले आहे. दमदार पावसामुळे सर्वच तालुक्यात पाणीच पाणी झाले असून आता जेमतेम ऑगस्ट महिना सुरु झाला असतानाच जिल्ह्यात ६५ टक्के पाऊस बरसल्याची नोंद घेण्यात आली आहे. विशेष म्हणजे, जिल्ह्यातील सात तालुक्यांनी मागील वर्षाचा रेकॉर्ड मोडला आहे. येत्या काळात बरसणाऱ्या पावसाने नक्कीच पूर्ण वर्षभराची पावसाची समस्या सुटणार यात शंका नाही.

जुन महिन्यात डोळे वटारलेल्या पावसाने जुलै महिन्याच्या पहिल्या पंधरवाड्यातही काही मेहरबानी दाखविली नाही. मात्र उशिरा का होईना वरुणदेव जिल्ह्यावर प्रसन्न झाले व १९ जुलैपासून जिल्ह्यात संततधार पावसाने सुरुवात केली. थेट रविवारपर्यंत (दि.४) अखंडितपणे बरसलेल्या पावसाने जिल्हा पाणीदार झाला आहे.

**५ ऑगस्ट २०२४ पर्यंत पडलेला पाऊस**

| तालुका | पाऊस (मिमी) | टक्केवारी |
|---|---|---|
| गोंदिया | ७००.५ | १०४.४ |
| आमगाव | ७१५.९ | ८७.९ |
| तिरोडा | ७१०.३ | १०७.४ |
| गोरेगाव | ७१९.४ | १२६ |
| सालेकसा | ६४१.७ | ९७.६ |
| देवरी | १००५.५ | १४३.६ |
| अर्जुनी-मोरगाव | १०५३ | १३५५ |
| सडक-अर्जुनी | ७४८.२ | ९८ |

या पावसामुळे जिल्ह्यात पूर परिस्थिती निर्माण होऊन नदी–नाले चांगलेच फुगून गेले आहेत. जिल्ह्यात ५ ऑगस्टपर्यंत सरासरी ६७४.५ मिमी पाऊस अपेक्षित असतानाच वास्तविक सरासरी ७९३.४ मिमी पाऊस बसरला असून त्याची ११७.६ एवढी टक्केवारी आहे. विशेष म्हणजे मागील वर्षी ५ ऑगस्टपर्यंत जिल्ह्यात सरासरी ६५८.८ मिमी पाऊस बसरला होता व त्याची १०१.७ एवढी टक्केवारी होती. यंदा ऑगस्ट महिनाच सुरु असून आताच सात तालुक्यांनी मागील वर्षीचा रेकार्ड मोडून काढला आहे.

### सालेकसा तालुक्यावर मेहरबानीची गरज

**जिल्ह्यातील सात तालुक्यांवर यंदा वरुणराजा मेहरबान दिसत आहे. कारण, सात तालुक्यांनी अपेक्षित सरासरी गाठली असून त्यपेक्षा पुढे निघून गेले आहेत. मात्र फक्त एकट्या सालेकसा तालुक्यात अपेक्षेपेक्षा कमी पाऊस बरसला आहे. सालेकसा तालुक्यात आतापर्यंत ६५७.७ मिमी पाऊस अपेक्षित आहे. मात्र येथे ६४१.७ मिमी पाऊस बरसला आहे.**

### सोमवारपासून पावसाने दिला उघाड

**१९ जुलैपुर्वी सर्वाच्या तोंडून फक्त येरे–येरे पावसा हीच हाक ऐकू येत होता. मात्र १९ जुलैपासून संततधार पावसाने सुरुवात केली व ५ ऑगस्टपर्यंत पावसाने दररोज हजेरी लावून जिल्हावासीयांची कामना पूर्ण केली. संततधार पावसामुळे सर्वच पाणीच पाणी झाले आहे. त्यातही दररोज पावसाची एकतरी सर बरसत असल्याने ढगाळ वातावरण कायम होते. एवढ्या पावसामुळे आता जिल्हावासी वैतागले असून आता बस कर अशी कामना ते करीत होते. वरुणदेवाने त्यांची हाक ऐकून ५ ऑगस्ट रोजी पावसाला ब्रेक दिला व सूर्यदेवाचे दर्शन झाले.**

# आरटीई प्रवेशाला आता गुरुवारपर्यंत मुदतवाढ

**गोंदिया:** आरटीई प्रवेशासाठी आता शिक्षण संचालनालयाकडून दुसऱ्यांदा मुदत वाढवून देण्यात आली असून आता पालकांना येत्या गुरुवारपर्यंत (दि.८) पाल्यांचा प्रवेश करता येणार आहे. तर सोमवारपर्यंत (दि.५) देण्यात आलेल्या मुदतवाढीनंतर जिल्ह्यात ६१५ प्रवेश निश्चित झाले आहेत. आता तीन दिवसांच्या मुदतवाढीनंतर त्यात आणखी भर पडणार, यात शंका वाटत नाही.

शिक्षण विभागाने यंदा आरटीईसाठी नवीन नियमावली जाहीर केली होती. त्यामध्ये खासगी शाळांना वगळण्यात आले होते. त्यामुळे हे प्रकरण न्यायालयात पोहोचले होते. अखेर न्यायालयाने शासनाची नवीन नियमावली रद्द करुन प्रवेश प्रक्रियेचा मार्ग मोकळा केला होता. त्यानुसार २३ जुलैपासून प्रवेश प्रक्रिया सुरु झाली व ३१ जुलैपर्यंत कागदपत्र पडताळणी व प्रवेश निश्चितीसाठी मुदत देण्यात आली होती. यंदा जिल्ह्यात आरटीईसाठी १३२ शाळांची नोंदणी असून त्यामध्ये ९०३ जागा राखीव आहेत. तर तीन हजार ३५ विद्यार्थ्यांचे अर्ज आले होते. त्यामधून निवड करण्यात आलेल्या ८८३ विद्यार्थ्यांना मॅसेज पाठविण्यात आले होते.

अशात ३१ जुलैपर्यंत जिल्ह्यात ५९९ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित




झाले होते. मात्र, पालकांची झालेली धावपळ बघता शिक्षण संचालनालयाकडून सोमवारपर्यंत मुदत वाढवून देण्यात आली. त्यानुसार सोमवारपर्यंत प्रवेशांची संख्या वाढून ६१५ झाली आहे.

# लाडकी बहीण योजनेचे अर्ज मंजूर होण्यात जिल्हा राज्यात अव्वल!

## २ लाख ६८ हजार अर्ज मंजूर,१२ हजार २९ बहिणींचे अर्ज झाले रद्द

**गोंदिया:** राज्य शासनाच्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी आतापर्यंत जिल्ह्यातील २ लाख ८८ हजार १९५ बहिणींनी अर्ज केले होते. यापैकी २ लाख ६८ हजार ९१५ महिलांचे अर्ज मंजूर झाले आहे. याचे लाडक्या बहिणींना मोबाइलवर संदेश देखील प्राप्त झाले असून दाखल केलेल्या अर्जापैकी सर्वाधिक अर्ज मंजूर होण्यात गोंदिया जिल्हा राज्यात अव्वल ठरला आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत महिलांना दर महिन्याला १५०० रुपये अनुदान दिले जाणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील लाडक्या बहिणींनी कागदपत्रांची जुळवाजुळव करुन अर्ज ऑनलाइन व ऑफलाइन अर्ज दाखल केले. य योजनेचा लाभ घेण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत मुदत आहे. तर रक्षाबंधनापुर्वी लाडक्या बहिणींच्या खात्यावर दोन महिन्यांचे ३ हजार रुपयांचे अनुदान जमा करण्याची घोषणा राज्य सरकारने केली आहे. त्यामुळे सध्या या योजनेचे युद्धपातळीवर कार्य केले जात आहे.

जिल्हा महिला व बालकल्याण विभागाची संपूर्ण यंत्रणा यात गेल्या महिनाभरापासून व्यव्त आहे. जवळप– ा स साडेचार हजारांवर कर्मचारी यात परिश्रम घेत आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी गोंदिया जिल्ह्यातील २ लाख ८८ हजार ९१५ लाडक्या बहिणींनी अर्ज दाखल केले होते. यापैकी २ लाख ६८ हजार ३१५ अर्ज मंजूर करण्यात आले आहे. तर १२ हजार २९ अर्ज अर्जातील विविध त्रुटीमुळे रद्द करणयात आले. विशेष म्हणजे, अर्जाचे हे आकडे केवळ ग्रामीण भागाचे आहे.



शहरातील अर्जाचा यात समावेश नाही. दाखल केलेल्या अर्जापैकी जिल्ह्यातील ९३ टक्के लाडक्या बहिणींचे अर्ज मंजूर झाले असून, सर्वाधिक अर्ज मंजूर होण्यात गोंदिया जिल्हा राज्यात अव्वल ठरला आहे. तर दुसऱ्या क्रमांकावर अकोला आणि तिसऱ्या क्रमांकावर रायगड जिल्हा आहे.

### प्रशासनाची जनजागृती, अंमलबजावणी

**लाडकी बहीण योजनेच्या लाभापासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहत कामा नये, यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे व्यापक जनजागृती आणि योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात आहे. त्यामुळेच सर्वाधिक अर्ज मंजूर होण्यात जिल्हा अव्वल ठरला आहे.**

**एकही पात्र लाभार्थी या योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये, यासाठी जि.प. प्रशासनाच्या सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी भरपूर मेहनत घेतली. व्यापक स्वरूपात जनजागृती केली. त्यामुळेच सर्वाधिक अर्ज मंजूर होण्यात जिल्हा राज्यात टॉप ठरला आहे.**
**एम.मृरगानंथम, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. गोंदिया**

# धानाच्या तनसावर होणार प्रक्रीयापौष्टीक चारा निर्मीतीसाठी पशुसंवर्धन विभागाचा पुढाकार



**भंडारा :–** जिल्हा विकास आराखडा अंतर्गत दुग्ध उत्पादनात वाढ करणे,चाऱ्याची पौष्टिकता वाढविणे तथा कमी खर्चात चारा उत्पादन करून चाऱ्यावर होणारा अधिकचा खर्च कमी करून आर्थिक उत्पन्नात भर घालणे व रोजगार उपलब्धी ह्या दृष्टीने जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी नुकतीच पशुसंवर्धन विभागाची बैठक घेतली.

जिल्ह्यात पशुपालकांकडे मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेल्या तनस (PaddyStraw) वर प्रक्रिया करून सकस चारा रुपातर करणे बाबत चर्चा करण्यात आली. उपलब्ध चाऱ्या पासून टिएमआर ब्लॉक्स तयार करण्याबाबत वरिष्ठ महाप्रबंधक, डॉ.व्ही.श्रीधर, यांनी सूचित केले. पशुपालकाना साठवणुकीसाठी व टिकविण्यासाठी तथा वाहतुकीसाठी TMR-Blocks सहज शक्य होतात.व पशुपालक याची निर्मिती तंत्रज्ञान उपलब्ध करून दिल्यास सहज तयार करू शकतील.

जिल्ह्यात मका लागवड वाढ झालेली असून धान्य रूपातील मका काढून घेतल्या नंतर उर्वरित रोपटे यापासून मुरघास तयार करता येऊ शकतो किंवा याचा वापर TMRBlocks करीता सुद्धा होऊ शकतो. भंडारा जिल्ह्यात तनस व रब्बी हंगामातील उत्पादना नानात्र उर्वरित वाळलेला चारा यावर कल्चर किंवा Enzyamatic प्रक्रिया करून निकृष्ट चाऱ्याची पौष्किता वाढवता येते.व रु.५/– खर्चा मध्ये ५०० ाश्र दुधात वाढ होत असल्याचे तछखढ प्रोफ्फेसर डॉ.मांडगवने, यांनी सांगितले व प्रायोगिक तत्वावर कल्चर किंवा एपूराश उपलब्ध करून दिले जाईल.व प्रशिक्षण सुद्धा दिले जाईल. असे डॉ.मांडगवने, यांनी कळविले.

या बैठकीला प्रादेशिक मा.प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, नागपूर विभाग नागपूर डॉ.सतीश राजू , व्हिएनआयटी प्रोफ्फेसर डॉ.मंडगवने, वरिष्ठ महाप्रबंधक, डॉ. व्ही. श्रीधर, प्राध्यापक माफसु,नागपूर डॉ.अतुल ढोक, कृषी विज्ञान केंद्राच्या, डॉ.उषा डोंगरवार, प्रकल्प संचालक आत्मा श्रीमती.उर्मिला चिखले, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त ,भंडारा डॉ. वाय.एस.वंजारी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद,भंडारा डॉ.जगन्नाथ देशट्टीवार, जिल्हा नियोजन अधिकारी श.क.बोरकर हे प्रामुख्याने उपस्थित होते.

बैठकीमध्ये चारा विषयक भंडारा जिल्ह्याची पार्श्वभूमी, योजना व शासन निर्णय यांचे सादरीकरण व माहिती पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी सादर केली. चारा प्रक्रिया प्रशिक्षणा करीता जिल्ह्यात आत्मा अंतर्गत , माविम अंतर्गत , तथा कृषी विज्ञान केंद्र ,भंडारा (साकोली) अंतर्गत कार्यरत शेतकरी बचत गट / उत्पादक गट यांना CultureVma करण्याचे प्रशिक्षण देऊन पुढे यामध्ये रोजगार उपलब्धी करता येईल असे प्राध्यापक डॉ.मांडवगने, यांनी स्पष्ट केले.

# मंडल यात्रेचा आज ७ ऑगस्ट रोजी गोंदियात समारोप

## ■प्रा.लक्ष्मण यादव व इंजि.ढोबळे करणार मार्गदर्शन ■ओबीसी चळवळीतील जेष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार

**गोंदिया:–** ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी जनजागृती अभियानांतर्गत ३ ऑगस्ट रोजी निघालेल्या मंडल यात्रेचा समारोप आज बुधवारला ७ ऑगस्ट सायकांळी ५ वाजता ग्रीन लॅण्ड लॉन,गोंदिया येथे होणार आहे.

या यात्रेचे गोंदिया जिल्ह्यात दुपारी २ वाजता सडक अर्जुनी, सायंकाळी ४ वाजता गोरेगाव येथे आगमण होणार असून गोंदियातील फूलचूर नाका येथे सायकांळी ५ वाजता पोचणार आहे. तिथून रॅलीने ही यात्रा कार्यक्रम स्थळी पोचेल

मंडल यात्रा जनजागृती कार्यक्रमाच्या समारोप कार्यक्रमाला मुख्य वक्ते म्हणून ओबीसी बहुजन विचारवंत दिल्ली विद्यापीठाचे प्रा.लक्ष्मण यादव तसेच ओबीसी सेवा संघाचे अध्यक्ष इंजि.प्रदिप ढोबळे उपस्थित राहणार आहेत. यात्रेचे नेतृत्व ओबीसी युवा अधिकार मंचचे सयोंजक उमेश कोर्राम हे करीत आहेत.



या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ओबीसी सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष प्रा.बी.एम.करमरकर राहणार आहेत. या मंडल यात्रा समारोप कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ओबीसी अधिकार मंचचे खेमेंद्र कटरे, ओबीसी जनगणना समन्वय समितीचे सदानंद इलमे, ओबीसी सेवा संघाचे गोपाल सेलोकर, भैय्याजी लांबट, ओबीसी क्रांती मोर्चाचे संजय मते, सोशल युथ फार जस्टीसचे प्रमोद केसलकर, भानुदास केळझरकर, डॉ.बाळकृष्ण सार्वे उपस्थित राहणार आहेत.

तर या कार्यक्रमात गोंदिया जिल्ह्यात ओबीसी चळवळ रुजविण्यात २६ जुर्ले १९९८ पासून कार्य करणारे ओबीसींचे शिलेदार सत्कारमुर्ती म्हणून विनोद चव्हाण बोथली,रमेश ब्राम्हणकर गोंदिया,माधवराव फफुंडे नोनीटोला, कृष्णा बहेकार आसोली, चौकलाल येडे चांगोटोला, उमाशंकर ठाकूर चुलोद, एकनाथ साठवणे झांजिया, प्रा.राजेंद्र पटले तिरोडा उध्दव मेहंदळे इटखेडा, प्रेम साठवणे ठाणा यांच्यासह स्व.पेमेंद्र चव्हाण यांचा मरणोपरांत सत्कार करण्यात येणार आहे.



या कार्यक्रमाला ओबीसी बहुजन चळवळीतील बंधु–भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन बैठकीला ओबीसी अधिकार मंचचे सयोंजक खेमेंद्र कटरे, अशोक लंजे, खेमेंद्र कटरे, अशोक लंजे, सुनिल तरोणे, कैलास भेलावे, सावन कटरे, विनायक येडेवार, भुमेश शेंडे, दिनेश हुकरे, हरिष ब्राम्हणकर, राजीव ठकरेले, सुनिल पटले, उमेश कटरे, अतुल सतदेवे, मोहसीन खान, प्रा.सविता बेदरकर, मालती किन्नाके, रोशन मडामे, तिर्थराज उके, रवि अंबुले, लिलाधर पाथोडे, संदिप तिडके, किशोर बावनकर,किशोर डोंगरवार, हरिराम येलणे, राहुल येल्ले, राजेश चांदेवार, राजेश नागरीकर, भुमेश ठाकरे, आर.आर.अगडे, विष्णु नागरीकर, कमल हटवार, रामभगत पाचे, सी.पी.बिसेन, प्रमोदकुमार बघेले, वशिष्ट खोब्रागडे, परेश दुरुगकर, नरेश परिहार, प्रमोद गुडधे,जितेश राणे, राजकुमार पटले,एड.पी.सी.चव्हाण, बंटी पंचबुध्दे, चंद्रभान तरोणे, ऋषीकांत शाहू, भुमेश ठाकरे, दिनेश हुकरे, रोशन बडोले, आर.आर.अगडे, केदार गोटेफोडे, सुरेश परशुरामकर, जनार्दन बांते यांच्यासह सर्व ओबीसी एससी, एसटी समाज संघटनेच्यावतीने करण्यत आले आहे.




## संपादकीय

# ऊठ ओबीसी जागा हो...!

७ ऑगस्ट मंडल आयोग दिनाचे औचित्य साधून देशाच्या कानाकोपऱ्यातून आजपर्यंत वेगवेगळ्या गटांमध्ये ओबीसींच्या हक्काचा लढा लढणारे सर्व कार्यकर्ते हे एकाच व्यासपीठावर येऊन नवा संकल्प घेणे, हे एक चांगले पाऊल ठरू शकेल. कोणत्याही राजकीय पाठबळाशिवाय लढणाऱ्या ओबीसी कार्यकर्त्यांची जिद्द पाहून आता राजकीय क्षेत्रात सुद्धा ओबीसी आंदोलनाची दखल घेण्यास सुरवात झाली, हे येथे महत्त्वाचे. दक्षिणेचा विचार करता तेथे डॉ.पेरियार स्वामींनी उभारलेल्या लढ्यामुळे तेथे काही प्रमाणात ओबीसींच्या हिताचे काम झाले. पण देशाच्या इतर भागात ओबीसी हा कधीही एकसंध नव्हता वा तो एकसंध होऊ नये, यासाठी प्रस्थापित समाज हा ओबीसींना नेहमी दिग्भ्रमित करीत आला आहे, हे आता लपून राहिले नाही. आपले हक्क हे आता मागितल्याने मिळणार नाही, तर ते आपल्याला हिरावून घेण्याला पर्याय उरला नसल्याचे लक्षात आल्याने ओबीसी तरुणाई सुद्धा रस्त्यावर उतरायला तयार असल्याचे या अधिवेशनाच्या माध्यमातून अधोरेखित झाले आहे. ओबीसींना त्यांच्या हक्कापासून रोखण्यासाठी राज्यकर्ते हे ओबीसींची जनगणना करीत नाही. मात्र, तेच काम पारतंत्र्यात इंग्रज करीत होते.

ओबीसींना न्याय देण्याची भूमिका परकीय इंग्रजांनी घेतली होती, त्याही वेळेस प्रस्थापितांनी विरोधच केला. आता तर राजकारण असो वा न्यायकारण असो यांच्या जोडीला असलेल्या प्रशासनाने सुद्धा ओबीसींना त्यांच्या हक्कापासून कसे दूर ठेवता येईल, याचाच सातत्याने प्रयत्न केल्याचा इतिहास या अधिवेशनाच्या माध्यमातून समोर मांडला गेला. स्वतंत्र भारतात मागासवर्गीयांना त्यांचे हक्क आणि अधिकार उच्चवर्णीय मिळू देणार नाही, हे संविधानकर्ते परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे चांगलेच ओळखून होते. म्हणून त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याचे महान कार्य डॉ. आंबेडकरांनी केले. घटनेच्या ३४१ व ३४२ कलमातील तरतुदींमुळे अनुसूचित जाती व जमातींना त्यांचे अधिकार मिळाले. त्यांच्यासाठी नेमलेल्या आयोगाला संवैधानिक दर्जा आहे. त्यांच्यासाठी स्वतंत्र बजेट सुद्धा आहे. त्यांचे अधिकार देताना तत्कालीन राज्यकर्त्यांनी फारसा विरोध केला नाही. त्याचे कारण असे की, हे दोन्ही घटक लोकसंख्येचा विचार केला तर प्रस्थापितांच्या एकाधिकारशाहीला फारसे नुकसान करणारे तर नव्हतेच, पण आपणच मागावर्गीयाचे मशिहा आहोत, असा संदेश देऊन त्यांची गठ्ठा मते मिळविण्याचा कुत्सित डाव सुद्धा या माध्यमातून साधला गेला. पण ओबीसींना त्यांचे अधिकार देण्यास मात्र प्रखर विरोध केला गेला. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी आपल्या ओबीसी बांधवांच्या हिताचा लढा कायम ठेवत त्यांनी घटनेतील ३४० कलमान्वये त्यांच्या हिताचे संरक्षण केले. पुढे लोकसभेत तत्कालीन सरकारने विश्वासघात केल्यामुळे त्यांनी कायदेमंत्री पदालाच ठोकर मारली. धास्तावलेल्या राज्यकर्त्यांनी आयोग नेमण्याचे स्वांग रचले, आयोगाचा रिपोर्टसुद्धा आला. पण तो संसदेत मांडलाच गेला नाही. त्यानंतर दुसऱ्या सरकारने ओबीसींच्या मुद्दावरच सत्ता मिळवली खरी, मात्र सत्तेत येताच त्यांनीसुद्धा दगा दिला.

स्व. विश्वनाथ प्रतापसिंग या नेत्याने ओबीसीसाठी थोडेफार करण्याचा प्रयत्न केला. परंतु, यामुळे त्यांना प्रधानमंत्री पदाच्या खुर्चीवर पाणी सोडावे लागले. न्यायालयातील वर्णवादी व्यवस्थेने ओबीसींना न्यायालयीन लढाईत सुद्धा रोखून धरले. ओबीसींना जातिजातीत लढविण्याचे धोरण राबवीत असताना धर्माच्या नावावर मात्र त्यांना एकत्र ठेवून आपले स्वार्थ साधण्याचे काम अद्यापही सुरूच आहे. आरक्षणाच्या नावावर समाजात गैरसमज पसरविण्याचे कार्य केले जात आहे. ओबीसींची शैक्षणिक प्रगती रोखण्यासाठी त्यांच्या शिष्यवृत्त्या नाकारल्या जात आहेत. ओबीसी विद्यार्थी गुणवत्ता धारण करीत असेल तर त्याला क्रिमीलेअरच्या जाळ्यात अडकवून त्याचे करिअर चौपट केले जात आहे. ओबीसी वगळता कोणालाही ती अट नाही. यावरून ओबीसी समाजाविरुद्ध रचल्या जात असलेले षडयंत्र आता लपून राहिले नाही. वास्तविक पाहता क्रिमीलेअरची अट ही आर्थिक आधारावर असायलाच नको आहे, ती लावायचीच असेल तर त्यासाठी सामाजिक विकासाच्या आधारे लावली गेली पाहिजे आणि ती सर्वांना लागू केली गेली पाहिजे. पण शिक्षणाच्या सोयी नाही, ओबीसींना शिष्यवृत्त्या नाही, ओबीसींचे जीवनमान ग्रामीण, शेतीची अवस्था वाईट, अशा परिस्थितीत जर आर्थिक आधारावर बंधने लावले जात असतील तर याचा सरळ सरळ अर्थ एकच होतो, तो म्हणजे ओबीसींच्या संवैधानिक हक्कांना नकार. न्यायालयात न्यायासाठी धावा केला तर न्यायालय म्हणते तुमची नेमकी संख्या माहीत नसल्याने तुमचे प्रश्न सोडवायचे कसे? सरकार म्हणते ओबीसींची जनगणना करणे शक्य नाही. या देशात पशुपक्ष्यांची गणती शक्य आहे. पण जिवंत माणसांची गणती कशी काय शक्य नाही. यासंबंधी आता ओबीसी समाज आत्मचिंतन करू लागला आहे.स्वातंत्र्यपूर्व काळापासून काँग्रेस असो वा भाजप हे कधीही ओबीसी विरोधीच राहिले आहेत. फक्त सत्तेसाठी ते एकमेकांचे विरोधक आहेत. जेव्हा जेव्हा ओबीसींच्या हिताचा मुद्दा आला, तेव्हा तेव्हा सत्तेच्या विरोधकांनी धार्मिक आंदोलनाच्या माध्यमातून ओबीसी युवकांना त्यांच्या हिताच्या लढ्यापासून तोडल्याचा इतिहास आहे. आता ओबीसी जागे होत आहेत. त्यामुळे राज्यकर्ते हे सुद्धा सावध भूमिका घेताना दिसत आहेत. यामुळे परत पुन्हा षडयंत्रांची खेळी खेळली जात आहे. देशातील सर्वच राजकीय पक्षांनी आता जातिगत आघाड्यांच्या माध्यमातून ओबीसींना रोखण्याचे कारस्थान केले जात आहे. त्या त्या समाजातील सामाजिक कार्यकर्त्यांना नाना प्रलोभने देत त्यांना आपल्या पक्षातील आघाड्यांच्या जोखडात बांधून ठेवले जात आहे. यामाध्यमातून ओबीसी असो वा अन्य मागासप्रवर्ग त्यांच्या लढ्याची धार कमी करण्याचा हा प्रस्थापितांचा प्रयत्न आहे. पुढे आम्ही एवढ्या लोकांना प्रतिनिधित्व दिले, मग त्यांनी काय केले, असा उलट प्रश्न करण्यासाठी हे प्रस्थापित मोकळे. पक्षात महत्त्वाची पदे तर द्यायची, पण काम करण्याची मुभा द्यायची नाही. एखाद्याने शहाणपणा केलाच, तर त्याला कसे संपवायचे हे प्रस्थापितांना चांगलेच ठाऊक असल्याने आपल्या समाजातून अशा आघाड्यावर असलेल्या नेत्यांपासून समाजाला काही मिळेल, अशी अपेक्षा करणे मूर्ख पणाचेच ठरेल. ओबीसींनी आपल्या न्याय मागण्यांसाठी आंदोलने करायला सुरवात केल्यापासून राज्यकर्त्यांच्या उरातही चांगलीच धडकी भरली आहे. त्यामुळे असे राजकीय पक्ष आपल्या चमच्यांच्या माध्यमातून या आंदोलनाला नवे वळण देण्याच्या प्रयत्नात असल्याचे चित्र आहे. यासाठी सत्ताधारी आणि विरोधक या दोघांतही कमालीचे समन्वय आहे. महाराष्ट्रात ओबीसींच्या लढ्याला धार आल्याने तेथे स्वतंत्र मंत्रालय देण्याची लगेच घोषणा होते, यावरून या लढ्याचे महत्त्व लक्षात घेतले पाहिजे. ओबीसी समाज हा देशाच्या राजकारणात उलथापालथ करणारा महत्त्वाचा घटक आहे. या समाजाने मनात आणले तर ओबीसींना सत्ताधारी होण्यापासून कोणी रोखू शकत नाही, हे प्रस्थापित ओळखून असल्याने दररोज ओबीसींविरुद्ध नवनवे षडयंत्र रचले जात आहेत. अलीकडेच भाजपप्रणीत सरकारने केंद्रात ओबीसी हितांचे बिल संसदेच्या सभागृहात ठेवले. लोकसभेत ते पारित सुद्धा केले गेले. भाजपला राज्यसभेतील परिस्थितीची जाण नाही, असे नाही.

काँग्रेसपक्ष हा कायम ओबीसी विरोधी राहिला आहे, हे उघड सत्य आहे. भारतीय जनता पक्ष हा नरेंद्र मोदी यांना ओबीसी म्हणून प्रोजेक्ट करून ओबीसींना कुरवाळण्याचा प्रयत्न केला गेला आहे. असे असताना काँग्रेस आणि भाजप यांच्या थिंकटँकने एकत्र येऊन तो ओबीसी हिताचा बिल राज्यसभेत पाडला. यावरून हे दोन्ही पक्ष ओबीसी समाजाला कसे मूर्ख बनवीत आहेत, हे ओबीसींनी लक्षात घेतले पाहिजे. ओबीसींना रोखण्यासाठी ओबीसींच्या आरक्षणाच्या वाटपाची खेळी केली जात आहे. याविषयी दक्ष राहणे गरजेचे आहे. एकीकडे न्यायालय म्हणते की ओबीसींची आकडेवारी माहीत नाही.

मग ओबीसींना कोणत्या आधारे २७ टक्के आरक्षण मिळाले,हा प्रश्न शेवटी न्यायालयातच उपस्थित झाला अनं लोकसंख्येच्या टक्केवारीचा प्रश्न निर्माण झाला. अनेक घटक ओबीसीत समावेशासाठी प्रयत्नशील आहेत. त्याचवेळी शासकीय नोकऱ्यांतील आरक्षण संपविले जात आहे. पदोन्नतीत आरक्षण नाकारले जात आहे. ओबीसींसंबंधाने वेगवेगळ्या कमिट्या व आयोगांनी दिलेल्या अहवालाला कचऱ्याच्या पेटीत टाकणे सुरू आहे, या सर्व बाबींचा विचार सर्वकंष होणे आवश्यक झाले आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# व्ही.पी.सिंग रिटर्न्स इन विदर्भा! मंडल यात्रेच्या निमित्ताने..

समाज मेलेला नाही, तो तसा कधीही मरत नसतो. मात्र सध्या तो झोपलेला आहे. त्याला जागवण्याची जबाबदारी आपली आहे, कारण आपण जिवंत आहोत!

मंडल आयोगाच्या समर्थनार्थ शिवसेनेचं नागपूर जिल्हाप्रमुख पद सोडून, माजी पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांच्या ब्रह्मपुरी येथील जाहीर सभेत मी जनता दलात प्रवेश केला होता. त्याला आता तीस वर्षे झालीत. त्यावेळेस मला अनेकांनी वेड्यात काढलं होतं. सेना सोडली नसती तर आमदार, मंत्री झालो असतो, असं सेना भाजपाचे मंत्री देखील बोलायचे. आताही बोलतात. त्यावेळी सेना सोडणं म्हणजे जिवावर उदार होणं, असा त्याचा अर्थ होता. 'काय झाडी, काय डोंगार, काय हाटील..!' अशी परिस्थिती त्यावेळी नव्हती. सेनेची दहशत होती. पण माझ्या बाबतीत मात्र तसं काही घडलं नाही. कारण मी सेना सोडण्याआधी शिवसेनाप्रमुखांशी मातोश्रीवर जाऊन सविस्तर चर्चा केली होती. माझी भूमिका मांडली होती. (योगायोगाने नागपूरचे कवीमित्र उल्हास मनोहर त्यावेळी माझ्यासोबत मातोश्रीवर होते. ते ह्या घटनेचे साक्षीदार आहेत.)

आज हे सारं आठवण्याचं कारण म्हणजे विदर्भातली काही तरुण मंडळी १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट अशी नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ, वर्धा या सात जिल्ह्यातून मंडल यात्रा काढत आहेत. प्रस्थापितांची राजकीय गुलामगिरी झुगारल्याशिवाय ओबीसींची मुक्ती शक्य नाही, हे भान ओबीसींना जेवढ्या लौकर येईल, तेवढंच ओबीसीसह इतर बहुजनांचं देखिल भलं होईल. देशाचंही भलं होईल. ओबीसी, बहुजनांना मिळणारं आरक्षण जणू आपल्या बापाच्या कमाईतून दिलं जाते, असा काही भुरट्या लोकांचा भ्रम आहे. यात ओबीसी मधील काही बिनडोक लोक देखील सामील आहेत, ही संतापजनक गोष्ट आहे.

नागेश चौधरी, डॉ शंकरराव चोखारे, विजय मेटकर, अनिल धवड, प्रभाकर देशमुख, विजय बाभुळकर, नामदेव खामकर, विठ्ठलराव देशमुख, रामभाऊ अडबोल वगैरे मंडळी ही मंडल आयोगाच्या चळवळीतली त्यावेळची पहिल्या फळीतील नेतेमंडळी होती. अनिल धवड यांच्यामुळे मी त्या चळवळीत ओढला गेलो होतो.

तीस वर्षानंतर का होईना पण ओबीसी, एनटी, एसबीसी मधील काही तरुणांना त्यांचे ध्येय आणि नेमकी वाट गवसली, याचा आनंद आहे. चळवळीतील प्रामाणिक ओबीसी, बहुजन नेत्यांच्या वाट्याला आलेली टिंगलटवाळी, उपहास हा व्ही. पी. सिंग यांच्याही वाट्याला आला होता.



ओबीसी-बहुजनविरोधी टोळीने अर्थात संघ भाजपाच्या लोकांनी त्यांना व्हिलन ठरवून बदनाम केलं होतं. 'मंडल विरूद्ध कमंडल' असा संघर्ष उभा करून व्ही. पी. सिंग यांचं सरकार भाजपाच्या लोकांनी पाडलं होतं! त्या षडयंत्राचे नायक लालकृष्ण अडवाणी होते. बाजपेयी त्यात सहभागी होते.

वर्णवादी, प्रस्थापित पक्षांनी ज्या व्ही. पी. सिंगांचं राजकारण संपवण्याचा प्रयत्न केला, तोच ममंडल मसिहाफ युवा यात्रेच्या निमित्ताने पुन्हा परतून आलाय, असा मला या प्रसंगी भास होतोय! तथापि भावनात्मक न होता काही बाबी आपण याप्रसंगी समजून घेतल्या पाहिजेत!

भाजपा हा पहिल्या नंबरचा आरक्षणविरोधी पक्ष आहे. त्याची सारी धोरणे ओबीसी, बहुजन विरोधी आहेत. ओबीसींची जनगणना करण्याला त्यांनी स्पष्टपणे संसदेत नकार दिलेला आहे.

महाविकास आघाडीचं सरकार महाराष्ट्रात अडीच वर्षे होतं. ओबीसी साठी 'शेकडो होस्टेल बांधणार' अशा घोषणा ओबीसी मंर्त्यांनी केल्यात. प्रत्यक्षात किती होस्टेल बांधले आहेत? याचाही विचार होणे गरजेचे आहे.

कुणीतरी नेता येतो, वरवर समर्थन करतो, पैसे देतो, त्याच्यामुळे बातम्या छापून येतील वगैरे सारख्या गोष्टींना चळवळीतील नेत्यांनी बळी पडता कामा नये!

मकोणत्याही पक्षातून असो, पण आपला ओबीसी/आपल्या समाजाचा माणूस निवडून आला पाहिजेफ अशी भूमिका शुध्द मूर्खपणाची आहे. हा समाजविरोधी विचार आहे, याचे भान आपल्याला असले पाहिजे. समाज महत्त्वाचा नाही, नेत्यांची बांधिलकी, प्रामाणिकपणा महत्वाचा आहे!

ओबीसी युवा अधिकार मंच, संघर्ष वाहिनी आणि विविध संघटनांच्या वतीने ही यात्रा आयोजित केली आहे. त्यातील युवा नेत्यांना युवक, विद्यार्थी आणि ओबीसी, बहुजन प्रश्नांची चांगली जाण आहे. पण नवे शैक्षणिक धोरण, आरोग्य, शेती, लोकशाही, राजकारणाचे देशी तालिबानीकरण, निर्लज्ज पक्षांतरे, मीडियाचा मुर्दाडपणा, विकावू न्यायालये या ज्वलंत विषयावर देखिल युवकांनी चर्चा करायला हवी. कोणतीही चळवळ ही राजकारणाच्या शुद्धीकरणासाठी आणि लोकशाहीच्या सक्षमीकरणासाठी कामी आली पाहिजे, राजकारण्यांच्या समोर शेपटी हलविण्यासाठी नव्हे! ओबीसी मधील असंतोषाची धग मतपेटीमधून व्यक्त झाली पाहिजे. अन्यथा आपले मोर्चे, मेळावे यांना काहीही अर्थ नाही. अशा चळवळीमधूनच स्वतंत्र बाण्याचे, सामाजिक बांधिलकी असलेले अभ्यासू आणि समर्पित तरूण नेते तयार होतील, याची काळजी चळवळींनी घेतली पाहिजे.

असंख्य लोक असतील ज्यांनी मंडल चळवळीला कधीकाळी वाहून घेतलं होतं. त्यांचीही त्यावेळी टिंगल टवाळी झाली असेल. घरच्या लोकांनीही त्यांना मुर्खात काढलं असेल. पण आज ही मंडल यात्रा बघून नक्कीच त्यांचे डोळे पाणावतील! आपली मेहनत अगदीच वाया गेली नाही, याचं समाधान त्यांच्या चेहऱ्यावर असेल! आज तेही त्यांच्या पोरांना, सुनेला, बायकोला अभिमानाने त्यांचा जुना वेडेपणा सांगू शकतील. इतिहासातील त्यांच्याही जखमा काही प्रमाणात का होईना पण भरून निघतील. पुन्हा त्यांच्या काळजात व्ही. पी. सिंग नावाचं वादळ जोरात परतून आलेलं असेल.

तेव्हा, समस्त ओबीसींनो उठा! मंदिर, मशिद, पुतळे, पुरस्कार, मूर्तिपूजा, व्यक्तिपूजा यातून बाहेर या! इतिहास इतिहास करत बसू नका.. त्यातून बाहेर या! रस्त्यावर उतरून नव्या मंडल सैनिकांचे स्वागत करा! केवळ महापुरुषांच्या कहाण्या सांगण्यात, ऐकण्यात धन्यता मानू नका. त्याच त्या इतिहासात रमण्याच्या घोडचुका भविष्यात करू नका! तुम्हाला प्रिय असणारे महापुरूष आजच्या प्रसंगी कसे वागले असते, याचा विचार करा! तसे वागण्याचा प्रयत्न करा! खऱ्या अर्थानं तीच त्या महापुरुषांची अपेक्षा होती. तीच त्यांना श्रध्दांजली ठरेल!

तुम्ही साथ दिली तर या लढाईला आणखी गती येणार आहे! तुमच्याच पुढच्या पिढ्या बर्बाद होण्यापासून वाचणार आहेत, एवढं लक्षात घ्या. एक नवा इतिहास लिहिण्याची सुरुवात होत आहे, त्यात आपलेही योगदान असू द्या..!

मी सांगतो, अशाच थेट वागणार मुंग्या आणि हेच गीत गाऊ लागणार मुंग्या जुना नवा हिशेब थेट मागणार मुंग्या एकदिवस जागणार..
जागणार मुंग्या!!
पाली, साप, घोरपडी सावधान रे
सरड्यांचे नवे गडी, सावधान रे
अवती भवती दूर दूर सावधान रे
अन् घरातले फितूर सावधान रे..
आरपार शस्त्र थेट डागणार मुंग्या..
एक दिवस जागणार.. जागणार मुंग्या!!
तूर्तास एवढंच!

**ज्ञानेश वाकुडकर,** अध्यक्ष
लोकजागर ९८२२२७८९८८

# मंडल दिवस चिरायू होवो!

७ ऑगस्ट म्हणजेच ओबीसी साजरा करतात तो मंडल आयोग दिन. होय, हा दिवस म्हणजे ओबीसी साठी सणोत्सवासारखा झालाय अलिकडे. पोळा बलिप्रतिपदा ओनम बिहू बेंदूर नागपंचमी वा मूळनिवासी अवैदिकांच्या इतर उत्सवांपेक्षाही काकणभर अधिक लोकप्रिय मंडल दिन. भारतीय खंडात सर्वदूर पसरलेल्या एवढ्या मोठ्या ओबीसी समूहाचा हा मुक्तीदिवस. होय, ओबीसीला आरक्षण मिळाले अन् ओबीसी अस्मिता मूळ धरु लागली या दिवसापासून. तीस वर्षापूर्वी मा. व्ही.पी. सिंग हे प्रधानमंत्री ओबीसीचे मसिहा ठरले. कमंडलधारी अधर्मी कुपमंडूकांना ते बधले नाही. मंडलसाठी सरकार पडले तरी पर्वा नाही केली व्हीपींनी. नंतर ओबीसी चळवळीच्या मुखंडांनी प्राणपणाने हा दिवस मंडलदिन म्हणून अनोख्या पद्धतीने साजरा करत ओबीसींच्या विविध समस्या, मागण्या, ओबीसीच्या दैनावस्थेचे मंथन चिंतन विमर्शन सुरु झाले. ओबीसी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, नोकरीत आरक्षण, शैक्षणिक आरक्षण, क्रिमिलेयर यासंबंधी येणाऱ्या अडचणी ओबीसींना नवी ओळख देणाऱ्या ठरल्या. पण धर्माच्या नावाखाली वर्णजातीव्यवस्थेत ओबीसींना दिलेले शूद्रत्व, दुय्यम स्थान ओबीसींचे कमालीचे नुकसान करणारे, अन्यायकारक आहे ही विचार प्रक्रिया ओबीसीत सुरुझाली.

आरक्षण म्हणजे गरीबी दूर करण्याचा कार्यक्रम नसून जातीव्यवस्थेने पिढ्यानपिढ्या शिक्षण शासन प्रशासन आणि समाजातील प्रतिष्ठित मोक्याची पदं, निर्णय



प्रक्रिया यंत्रणेत प्रतिनिधित्व होय. या आकलनामुळे ओबीसी आपली मूळ संस्कृती शेती श्रम कृषमायेशी निगडीत जीवनपद्धतीत शोधू लागले. वैदिकांनी केलेले तिचे ब्राम्हणीकरण, त्यातून ओबीसीवर लादलेली धार्मिक गुलामी या अनुषंगाने सिंधु संस्कृती पासून, आर्य आक्रमणापासून सूरू झालेला आर्य-अनार्य संघर्ष, वैदिक-अवैदिक, वामन -बळी, बळीवंश, वैदिक- लोकायत, वैदिक -जैन, बुद्ध, धर्ममार्तंड-संतपरंपरा, क्रांती-प्रतिक्रांती, इथपासून तर ब्राह्मण-ब्राम्हणेतर संघर्ष यात ओबीसीचा सांस्कृतिक वारसा आता दिसतो आहे.

या दिवसाचे महत्व ओबीसींना अधिक यासाठी वाटत आहे, कारण मंडलनंतरच्या काळात ओबीसी जागरण मोठ्या प्रमाणात झाले. ओबीसी वर अन्याय कारक ठरलेलं उच्चजातीय वर्चस्व झुगारुन दिल्याशिवाय पर्याय नाही ही सत्यशोधक ब्राम्हणेतर चळवळीची कार्यप्रणाली ओबीसींना खुणावत असताना ओबीसीमधील विविध जातीच्या जातसंघटनाही उदयास येऊन अवमान कारक जातीव्यवस्थेतील त्यांना मिळणारे स्थान नाकारले जाऊन प्रबोधनाकडे झुकलेल्या दिसतात.

पुरोहिताशिवाय सामाजिक कार्य लग्नादि धार्मिक विधी करण्याची सत्यशोधकी परंपरा स्वीकारुन कार्य करणे ही बाब खूप महत्त्वपूर्ण होय. त्यामुळे ब्राम्हणी वर्चस्व फेकून देऊन जातीव्यवस्थेने लादलेले दास्यत्व नाकारता येते. धर्मग्रंथात ओबीसींना ज्या पद्धतीने अधिकार वंचित ठेवले, ते अधिकार प्राप्तीसाठी हा संघर्ष होय. या टप्प्यावर आलेला हा ओबीसी लढा जातीजनगणनेच्या मागणीने आणखी समृद्ध होत आहे. म्हणून सत्ताधारी नेतृत्व ओबीसींना काही दिल्याचा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचे ओबीसींना जाणवते आहे. कारण ओबीसी समूह आणि शेतकरी एकदा पेटला की कुणाचीही मुलाहिजा करणार नाही. हे ओबीसी विरोधक उत्तमपणे जाणून आहेत.

ओबीसी आंदोलकांचा मंडलदिवसाच्या निमित्ताने वाढलेला उत्साह या व्यवस्थेला धडकी भरणारा वाटला पाहिजे. जय ओबीसी हा नारा आता भारतभर गूंज उठवत, "आधा नही पुरा करो मंडल आयोग लागू करो" या मागणीला नवी ऊर्जा देणारा आहे. हा ओबीसीचा महोत्सव आज साजरा होत असताना मंडलदिनाच्या ओबीसी शिलेदारांना अगणित सदिच्छा देऊ या. जय ओबीसी. जय जोतिबा...

**अनुज हुलके**

## धान्य दुकानदारांनी ई-मशीन तहसील कार्यालयात केली जमा

**अर्जुनी मोरगाव:-** तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानांवर मागील काही दिवसांपासून ई-पॉज मशीन सर्व्हर डाऊन असल्याने धान्य वाटप करण्यात अडथळे येत आहेत. त्यामुळे जिल्हा स्वस्त धान्य दुकानदार व केरोसिन परवानाधारक संघटनेच्या सूचनेनुसार संघटनेने ई-पॉज मशीन जमा करुन घेतली.

राज्यात साधारण ५४ हजार धान्य दुकानदार सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या या संगणकी करणानंतर २०१८ ई -पास द्वारे धान्य वितरण करतात तद्वत नंतर काल बाह्य झालेल्या २ जी ईपास मशीन द्वारे धान्य वितरण करीत आहेत. धान्य वाटप अत्याधुनिक ४जी सपोर्ट ई -पास मशीन देण्यासंदर्भात दोन वर्ष आंदोलन मोर्चे काढल्यानंतर ई पास मशीन पेक्षा जुनी टू जी चांगली होती म्हणण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

महिन्यापासून ई पास मशीन वर धान्य वितरण करताना सातत्याने होणारे सर्व्हर डाऊन या प्रकारच्या येणाऱ्या तांत्रिक अडचणीमुळे धान्य वितरण करता येत नाही. त्यामुळे लाभार्थी शिधापत्रिकाधारक आणि मोलमजुरी करणाऱ्या कामगारांना भर पावसात भिजत येऊन धान्यासाठी तात्काळत राहावे लागते व रिकाम्या हाताने परत जावे लागतात. त्यावेळी शिवीगाळ व धक्काबुक्की धान्यविक्रेत्या दुकानदारांना सहन करावा लागेतो राज्यातील धान्य दुकानदारांकडे धान्याचा साठा असून वितरण करण्यासाठी तालुका स्तरापासून अनेक तक्रारी देऊन सकारात्मक उपाययोजना न झाल्याने त्याची दखल ५ ऑगस्ट २०२४ ला तालुक्यातील सर्व धान्य दुकानदारांनीई-मशीन तहसील कार्यालयात अर्जुनी मोर येथे वापस केली.

याप्रसंगी दिलीप जैन, अभय फुल्लके, दादाजी शेलोकर, चंपालाल पालीवाल, बाबुराव भोयर, सुगंधा नाकाडे, मीना गावड ,चंदू खुणे दिलीप मेश्राम श्रीदान पालीवाल, सुभाष देशमुख, ललिता सोनवणे, लक्ष्मण नाकाडे, दीनदयाळ रहिले, विद्या बारसागडे, हेमराज भेडारकर इत्यादी तालुक्यातील राशन दुकानदार उपस्थित होते

## ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेंतर्गत अर्ज करण्यास २० ऑगस्ट पर्यंत मुदतवाढ

**गोंदिया :-** बहुजन कल्याण विभागांतर्गत ज्ञानज्योती सावित्रीबाई फ्फुले आधार योजना सन २०२४-२५ या सत्रापासून सुरु करण्यात आलेली आहे. शैक्षणिक सत्र २०२४-२५ करीता सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. या योजनेंतर्गत सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात उच्च शिक्षणाच्या प्रथम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी २० ऑगस्ट २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तरी जिल्ह्यातील इच्छुक विद्यार्थ्यांनी अर्ज भरुन आवश्यक त्या कागदपत्रांसह सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागे, पतंगा मैदान, गोंदिया यांचेकडे सादर करावे, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक विनोद मोहतुरे यांनी केले आहे.

## १९ ऑगस्ट पर्यंत जिल्ह्यात मनाई आदेश लागू

**गोंदिया:** पोलीस अधीक्षक गोंदिया कार्यालयाचे ३० जुलै २०२४ चे पत्रानुसार दिनांक ५ ते १९ ऑगस्ट २०२४ या कालावधीत जिल्ह्यात विविध पक्ष व संघटनांकडून त्यांच्या प्रलंबीत मागण्या संदर्भाने उपोषणे, धरणे, मोर्चे, रास्ता रोको, जेल भरो व संप इत्यादी आंदोलने आयोजित केली जात आहेत.त्यामुळे जिल्ह्यात कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, गोंदिया यांना प्राप्त अधिकाराअंतर्गत सन १९५१ च्या मुंबई पोलीस अधिनियम क्रमांक २२ चे कलम ३७ (१) (३) अन्वये दिनांक ५ ऑगस्ट पासून ते १९ ऑगस्ट २०२४ पर्यंत अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी विजया बनकर यांनी जिल्ह्यात मनाई आदेश लागू केले आहे.

# आदिवासीनी,९ ऑगस्ट जागतिक मुळनिवासी दिवस भारतात का साजरा करावा?

भारतातील आदिवासी लोक, ९ ऑगस्ट हा जागतिक मुळनिवासी दिवस, साजरा करण्यास रस्त्यावर येऊन नाचत आहेत. असे रस्त्यांवर येऊन का नाचत आहेत? असे आदिवासीना विचारले, तर याचे उत्तर आदिवासीतील उच्चभ्रू लोक सांगतात की, आम्हा आदिवासीत न्रुत्य करने, वाद्य वाजविने, गाणे गाऊन आपला आनंद व्यक्त करने, हा आमच्या संस्क्रुतीचा व पंरपरेचा एक भाग आहे, तर न्रुत्यु-गायन करने वाद्य-वाजविने ही आमची जीवन पद्धती आहे, आम्ही त्याचेच पालन करतो. असे सांगतात. असे असले तरी पण, आदिवासी लोक आपल्या अधिकारावर पुर्णत: अनभिज्ञ असून, ते गंभीर नाहीत. त्यामुळे आदिवासी लोक, आपले अधिकार छिणून घेण्यावजी रस्त्यांवर नाचत असतात.


प्रिय, आदिवासी बंधू / भगीनीनो, आपण ९ ऑगस्ट जागतीक मुळनिवासी दिवसा निमित्ताने, जगातील आदिवासीना, संयुक्त राष्ट्र संघाने बहाल केलेले, खालील प्रमाणे विश्वव्यापी अधिकार, त्यांना बहाल झाले असून, त्याचा आनंद व्यक्त करण्यास ते रस्त्यावर येऊन जल्लोष करतात.

मात्र, हेच अधिकार भारतीय आदिवासीना मिळाले का? आपण याचा गांभिर्याने विचार करावा. जर आपणास असे हे अधिकार मिळालेच नसेल तर, ते आपले हक्क व अधिकार मिळविण्यासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची गरज आहे. मात्र भारतीय आदिवासीतील परिस्थीती अगदी ऊलटी आहे. आदिवासी लोक आपले अधिकार छिनून घेत नाहीत, ते नांचण्यातच दंग आहेत. त्यामुळे जगातील मुळनिवासी लोक भारतीय आदिवासीकडे पाहून ते हसत आहेत.

सबब, आदिवासी लोकनी खालील मुद्यावर गंभीर विचार करण्याची गरज आहे. यावर जर काही शंका असल्यास, समाजाच्या भल्यासाठी खुली चर्चा करावी, अशी विनंती आहे.

भारतीय आदिवासी आणि जगातील मुळनिवासी !

१) संयुक्त राष्ट्र संघाने (UNO) भारतीय आदिवासीना, मुळनिवासी अशी मान्यताच



दिली नाही. याचे कारण म्हणजे ----

२) भारत सरकारच्या प्रतिमंडळाने, संयुक्त राष्ट्र संघामद्ये लेखी सांगीतले आहे की, भारतात कोणीही आदिवासी व मुळनिवासी नाहीत. भारतात आहेत ते सर्वच अनुसूचीत जमाती आहेत.

३) भारत सरकारचे किंव्हा भारतातील कोणत्याही राज्य सरकारने ९ ऑगस्ट हा जागतिक मुळनिवासी दिवस भारतात आजरा करण्याचे अधिक्रुत असे कोणतेच आदेश जारी केले नाहीत.

४) भारत सरकारने संयुक्त राष्ट्र संघात, आदिवासीनां मुळनिवासीचा दर्जा बहाल करण्यास नकार दिल्याने, संयुक्त राष्ट्रव्दारा जगातील मुळनिवासीना दि. १३ सप्टेंबर २००७ च्या जाहिरनाम्या नुसार बहाल केलेले विश्वव्यापी अधिकार जगातील सर्व मुळनिवासीना मिळते, पण हे अधिकार भारतीय आदिवासीना मिळत नाही.

५) संयुक्त राष्ट्र संघाच्या जाहीरनाम्यानुसार जगातील सर्वच मुळनिवासी लोकांना Torture Act (अत्याचार कायदा) लागू झाला आहे. तर त्यावजी भारतायीय आदिवासीना SC । ST ( Prevention of Atrocities) Act- १९८९ लागू आहे. विषेश म्हणजे भारतीय आदिवासीत हिंदु व्यवस्थेसारखी, जाती व्यवस्था आणि अश्यप्रुष्यताही नाही. तरी देखील भारतीय आदिवासीना 'Torture Act" लागू करण्यावजी जाती व अत्याचार प्रतिबंध कायदाफ लागू करण्यात आला आहे.

६) तसेच जगातील सर्व मुळनिवासीना (Customary Law) पांरपारीक कायदा लागू आहे. तसा भारतात आदिवासीना वरील प्रमाणे पांरपारीक कायद्याचे प्रावधान असलेला कोणताही कायदा लागू केला गेला नाही. त्यामुळे भारतीय आदिवासीना आपल्या संस्कृतीच्या आधारे पुर्णत: जीवन जगता येत नाही.

७) संयुक्त राष्ट्र संघाच्या जाहिरनाम्या नुसार जगातील मुळनिवासीना स्वनिर्धारणाचे अधिकार (Rights of Self-determination) बहाल केले आहेत. ज्या आधारे जगातील मुळनिवासीना आपल्या सांस्क्रुतीक मुल्यांच्या स्व-प्रशासन स्थापण करता येते. उदा. कॉनाडामद्ये मुळनिवासी लोकाचे 'प्रथम राष्ट्र' (First Nation) स्थापण झाले आहे. अशा अधिकाराचे प्रावधान भारतीय सविधानात नाही अर्थात भारतीय आदिवासीना लागू नाही. जर भारत सरकारने, भारतीय सविधानात आदिवासीना मुळनिवासीचा दर्जा बहाल केला गेला असता तर, संयुक्त राष्ट्र संघाच्या १३ सप्टेबंर २००७ च्या जाहीरनाम्या नुसार जगातील मुळनिवासीना बहाल केलेले स्वनिर्धारणाचे अधिकार (Rights of Self-determination) भारतीय आदिवासीनाही लागू झाले असते. Rights of Self-determination, चा अर्थ. "स्वनिर्धारणाचे अधिकार" असा होतो. म्हणजेच आदिवासीव्दारा आदिवासीने, आदिवासीसाठी स्व-निर्णय घेण्याचे (स्व-शासण स्थापण करण्याचे) अधिकार होत. अशा या अधिकाराचे प्रावधान भारतीय सविधानात नाही. केंद्रीय पेसा कायदा-२००६ मध्ये अंशत: प्रमाणात आहे. पण, पेसा कायदा सर्वोच्य न्यायालयाच्या निर्णयानुसार जसाचा तसा लागू करण्यात आलेला नाही.

आणखी या व्यतिरीक्त विषयावर बरीच काही चर्चा होने गरजेचे आहे. या बाबत अधिक माहिती पाहीजे असल्यास माझे पुस्तक "मुळरहिवासी जंगलातून, संयुक्त राष्ट्र संघात' वाचावे.

**(लटारी मडावी)**
**नागपूर-२६**
**मो. नं.९६१८३५९२६६**

# सर्वसामान्य नागरिकांना केंद्रबिंदू मानून लोकाभिमुख कामे करा

## जिल्हाधिकारी प्रजित नायर, जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल दिन साजरा



**गोंदिया:-** सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्याची तसेच शासनाच्या विविध योजनांची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी महसूल विभाग पार पाडत असतो. महसूल विभागाकडून सर्वच नागरिकांच्या अपेक्षा असतात. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना केंद्रबिंदू मानून लोकाभिमुख कामे करावी, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात "महसूल दिन' साजरा करण्यात आला, त्यावेळी ते अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, निवासी उपजिल्हाधिकारी विजया बनकर, उपजिल्हाधिकारी (सामान्य) मानसी पाटील, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) भैय्यासाहेब बेहेरे, जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल धोंगडे, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख रोहिणी सागरे, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी प्रशांत इंगोले, अपर तहसलिदार विशाल सोनवणे यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.

श्री. नायर पुढे म्हणाले, सर्वसामान्य नागरिकांचा महसूल विभागाशी दैनंदिन कामकाजासाठी संबंध येत असतो, त्यामुळे शासकीय कामात महसूल विभागाची महत्वाची भूमिका आहे. जमिनीशी संबंधित अनेक लोकं कामानिमीत्त महसूल विभागाकडे येत असतात. त्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या कामाला महत्व देवून आपल्या जबाबदारी व कर्तव्याची जाणीव ठेवून कामे पार पाडावीत असे त्यांनी सांगितले.

श्री. पिंगळे म्हणाले, प्रत्येकाने सकारात्मक दृष्टीकोन ठेवून काम करावे. प्रशासनात काम करताना ताण-तणावाला सामोरे जावे लागते, त्यामुळे आपल्या आरोग्यावर त्याचा विपरित परिणाम होत असतो. सर्वसामान्य लोकांचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केल्यास निश्चितच प्रत्येकाच्या मनात दिव्यत्वाची प्रचिती येईल असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकातून निवासी उपजिल्हाधिकारी विजया बनकर म्हणाल्या, महसूल विभागाचा सर्वसामान्य जनतेशी थेट संपर्क येत असतो. समान्य जनतेच्या प्रश्नांचे/तक्रारींचे निराकरण करण्याचे काम महसूल विभाग करीत असतो.

नैसर्गिक आपत्ती काळात समन्वय ठेवून सतर्क राहणे तसेच निवडणुकीची कामे सक्षमपणे पार पाडण्याची जबाबदारी महसूल विभाग पार पाडत असतो. १ ते १५ ऑगस्ट या कालावधीत "महसूल पंधरवाडा' निमीत्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख रोहिणी सागरे, उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, अपर तहसिलदार विशाल सोनवणे तसेच अश्विनी पवार यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी जिल्ह्यांतर्गत तलाठी संवर्गातील सर्वोत्कृष्ठ सेवेबद्दल केशवराव देऊजी बागडे यांना आदर्श तलाठी पुरस्कार देवून त्यांचा जिल्हाधिकाऱ्यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच रिना परसराम मरसकोल्हे, हर्षल नेवचंद वरखडे व निकेश शेरसिंग पंधरे यांना मान्यवरांचे हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संतोष शेंडे यांनी केले. उपस्थितांचे आभार उपजिल्हाधिकारी मानसी पाटील यांनी मानले. कार्यक्रमाचे नियोजन जिल्हा नाझर राकेश डोंगरे यांनी केले. कार्यक्रमास अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सीएस मोहबेंच्या चौकशीसाठी समिती दाखल

## जिल्हा शल्य चिकित्सकांच्या अडचणीत वाढ, विविध गंभीर आरोपांची चौकशी

**गोंदिया:** मृत व्यक्तींना जीवंत असल्याचे प्रमाणपत्र देणे, सुदृढ व्यक्तीला व्यंधत्व प्रमाणपत्र देणे, असे विविध आरोप जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अंबरीश मोहबे यांच्यावर करण्यात आले होते. त्याची चौकशी सुरु झाली. पुन्हा मंगळवारी (दि.३०) आरोग्य उपसंचालक डॉ. निमगडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गोंदियात दाखल झाली व त्यांच्यावरील आरोपांची चौकशी करण्यात आली. आता चौकशीत काय आढळले? डॉ. मोहबे यांच्यावर कारवाई करण्यात येते काय? हे बघावे लागणार आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक अंबरीश मोहबे यांनी १४ मृत व्यक्तीना जिवंत प्रमाणपत्र दिले. एका प्रजनन दाम्पत्याला बंधयत्व प्रमाणपत्र दिले. कागदपत्रांअभावी अवैध नर्सिंग होमला मंजूरी देणे, बेकायदेशीर सोनोग्राफी केंद्रांना परवानगी देणे, जिल्ह्यातील सर्व उपजिल्हा रुग्णालये व जिल्हा रुग्णालयात कार्यरत डॉक्टरांकडून मासिक वसुली करुन त्यांच्या गैरहजेरीचे हजेरीमध्ये रुपांतर




करणे, असे विविध आरोप डॉ. मोहबे यांच्यावर करण्यात आले होते. त्याची तक्रार देखील वरिष्ठांकडे करण्यात आली होती. या आरोपांची तपासणी करण्यासाठी आरोग्य विभागाच्या चमूने यापुर्वी दोनवेळा चौकशी केली.

नागपूरचे अतिरिक्त उपसंचालक डॉ. प्रमोद गवई यांनी केलेल्या चौकशीत १४ मृतांना फिटनेस प्रमाणपत्र दिले आणि त्या मृत लोकांच्या मृत्यूची पुष्ठी केली आणि त्यांचा अहवाल पाठवला. यासोबतच डॉ. मोहबे यांच्या निलंबनाचा प्रस्तावही आरोग्य आयुक्तांकडे पाठविण्यात आला असून जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार गोंदिया मेडिकल कॉलेजचे डीन डॉ. कुसुमाकर घोरपडे यांनी ही चौकशी केली. त्यांनी सर्व तथ्यांची सखोल चौकशी करुन सर्व मृत्यूंची पुष्ठी केली. इतर

### प्रकरण पोहोचले न्यायालयात

**डॉ. अंबरीश मोहबे यांच्या विरोधात नागपूर उच्च न्यायालयात जनहित याचिकाही दाखल करण्यात आली होती. त्यात सोमवारी (दि.२९) सर्व कागदपत्रांची छाननी करण्यात आली असून उच्च न्यायालयाकडून दोन्ही पक्षांना नोटीस बजावण्यात आली आहे.**

मुद्यांवरही त्यांनी आपला तपास अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना सादर केला. हे संपूर्ण प्रकरण सलग ३ महिन्यांपासून सुरु असल्याचे पाहून नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनीही नागपुरच्या आरोग्य विभागाच्या उपसंचालक डॉ. कांचन वानेरे आणि गोंदियाचे जिल्हाधिकारी प्रजित नायर यांना या संपूर्ण प्रकरणाचा अहवाल मागवला आहे. मंगळवारी (दि.३०) डॉ. निमगडे यांच्या अध्यक्षतेखाली गोंदियात दाखल झालेल्या तपास समितीने तपासासंबंधीची सर्व कागदपत्रे ताब्यात घेतली.

# शहरातील केरकचऱ्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

## शहरवासीयांचे आरोग्य धोक्यात, जागा शोधण्यात नगर परिषद पुन्हा अपयशी

**गोंदिया:** शहरातून दररोज ४० टन कचरा निघतो. पण या केरकचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी नगर परिषदेकडे घनकचरा प्रकल्पाचा अभाव आहे. परिणामी जागा मिळेल तिथे टाक कचरा, अशीच स्थिती आहे. त्यातच आता नगर परिषदेने घनकचरा प्रकल्पासाठी छोटा गोंदिया परिसरातील पांगोली नदीघाटाजवळ जागा निश्चित केली आहे. यामुळे नव्या वादाला सुरुवात झाली असून शहरातील कचऱ्याच्या विल्हेवाटीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

शहराची लोकसंख्या दीड लाखावर गेली असून, गेल्या आठ-दहा वर्षात शहराचा चारही बाजूने विस्तार झाला आहे. शहरातील केरकचऱ्याची नियमित विल्हेवाट लावण्यासाठी नगर परिषदेने २५० वर सफाई कामगार, ४० घंटागाड्या, ट्रॅक्टर, तसेच नगर परिषदेत स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. शहरातून दररोज ४० टन कचरा संकलित होतो. या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी १०० वर्षे पूर्ण झालेल्या नगर परिषदेकडे अद्यापही घनकचरा प्रकल्पाची व्यवस्था नाही. त्यामुळे शहराबाहेर जागा मिळेल तिथे टक कचरा, हेच धोरण अवलंबिले जात आहे.

### घनकचरा प्रकल्पाची जागा कशी बदलली

**नगर परिषदेने काही महिन्यांपुर्वी चुलोद परिसरातील जागा घनकचरा प्रकल्पासाठी निश्चित केली होती. या ठिकाणी हा प्रकल्प उभारणे ज़वळपास निश्चित सुद्धा झाला होता. मात्र यानंतर दोन महिन्यांतच नगर परिषदेला या प्रकल्पासाठी दुसरी जागा शोधण्याची वेळ का आली, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**

### शहरात घाणीचे साम्राज्य कायम

**सध्या पावसाळ्याचे दिवस सुरु असून, शहरातील केरकचऱ्याची नियमित विल्हेवाट लावली जात नसल्याने शहरातील जवळपास सर्वच भागात रस्त्यालगत केरकचऱ्याचे ढिगारे पडलेले आढळतात. यामुळे आरोग्य धोक्यात आले आहे.**

**मी दोन दिवसांपुर्वीच गोंदिया नगर परिषदेला चार्ज घेतला आहे. त्यामुळे प्रकल्पाबाबत सविस्त माहिती नाही. मी याबाबतची सविस्तर माहिती घेऊन सांगतो.**
**-संदीप चिद्रावार, नगर परिषद, मुख्याधिकारी**



तर घनकचरा प्रकल्पासाठी जागा निश्चित करताना अनेकदा अर्थकारण आडवे आल्याचे बोलले जाते. त्यामुळेच हा प्रश्न अद्यापही मार्गी लागला नाही. त्यातच आता नगर परिषदेने शहरालगत असलेल्या पांगोली नदीघाट परिसरात घनकचरा प्रकल्पासाठी जागा निश्चित करुन नव्या वादाला तोंड फोडले आहे. हा परिसर शहरालगत असून यालाच लागून नागरी वसाहत आहे. शिवाय या भागात धार्मिक स्थळ असल्याने या ठिकाणी घनकचरा प्रक्रिय प्रकल्प झाल्यास नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. त्यामुळेच या परिसरात हा प्रकल्प सुरु करण्यास शहरवासीयांकडून जोरदार विरोध केला जात आहे. शहररातील नागरिकांनी या प्रकल्पाला विरोध करण्याची घेतलेली भूमिका योग्य असल्याचा सूर आता उमटत आहे.

# भाड्याच्या वास्तूत आदिवासी वसतिगृहे

## कोंडवाडासदृश इमारतीत विद्यार्थ्यांची कुचंबणा, शासकीय इमारतीची प्रतीक्षा

गोंदिया: आदिवासी विद्यार्थ्यांना राहण्यासाठी शासकीय वसतिगृहाची जिल्हा मुख्यालयी एकही ईमारत नसल्याने विद्यार्थ्यांना भाड्याच्या इमारतीतच कोंडवाड्याप्रमाणे गुजराण करुन शिक्षण घ्यावे लागत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची कुचंबना होत असल्याने आदिवासी विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती कशी होणार? याचे उत्तर शासनाजवळही उरले नाही. मागासगर्वीय विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना इतर उन्नत समाजाबरोबर आणण्यासाठी शासनाच्या विविध योजना आहेत.

भारतीय राज्यघटेतसुद्धा मागावर्गीयांसाठी विशेष तरतूद केली गेली आहे. मात्र या प्रवर्गातील बहुतांश नागरिक अजूनही अज्ञान व गरिबीच्या छताखालीच गुजराण करीत आहे. घरात अठराविश्वे दारिद्रिय असल्याने विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण संस्थेत शिकविण्याची त्यांची ऐपत नाही. त्यामुळे सुज्ञ पालक स्वत: शिकले नसले तरी आपला पाल्या शिकून मोठा व्हावा, त्याच्या कमाईने कुटुंबाचे दारिद्रय दूर व्हावे, अशी आशा धरून आहे. आदिवासी बांधव आपल्या पाल्यांना शिकविण्यासाठी शहरातील शाळा, कॉलेजात दाखल करतात. त्यांच्या निवासाची सोय म्हणून शासनाच्या वसतिगृहाकडे पाहिले जाते.

दर्जेदार शिक्षणासोबतच दर्जेदार निवासाची व्यवस्थाही असावी, अशी त्यांची इच्छा असते. मात्र गोंदिया जिल्हा मुख्यालयी अशी दर्जेदार व्यवस्था नसल्याने आदिवासी विद्यार्थ्यांचे शिक्षणाचे स्वप्नच आता भंगण्याची वेळ आली आहे.

### ना वाचनालय, ना क्रीडांगण

**शहरात भाड्याच्या ईमारती घेऊन वेळोवेळी वसतिगृहाचा डेरा इकडून-तिकडे हलविला जात आहे. दोन-तीन ठिकाणच्या इमारती भाड्याने घेऊन तेथे एका खोलीत अनेक विद्यार्थ्यांना राहण्यास भाग पाडले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यास कसा होणार, असा प्रश्न आहे. सतत गोंगाट सुरु असल्याने विद्यार्थ्यांचे शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. भाड्याच्या वास्तूत पुरेशी स्वच्छता गृहे, भोजन कक्ष, वाचन कक्ष, क्रीडा मैदान यांचा अभाव आहे. वास्तृत वाचनालय नसल्याने अवांतर वाचन करुन सामान्य ज्ञान मिळविण्याचा मार्गच बंद झाला. मग आदिवासी विद्यार्थी स्पर्धा परीक्षेमध्ये तगणार कसे? त्यामुळे नोकऱ्यांमधील आदिवासींसाठी राखीव असलेल्या अनेक जागा अजूनही रिकाम्या आहेत. शहरात शासकीय वसतिगृहाची प्रशस्त ईमारत नसल्याने आदिवासी पालक विद्यार्थ्यांना वसतिगृहात टाकण्याचा दहादा विचार करतात. त्यामुळे काही विद्यार्थ्यांना मधूनच शिक्षण सोडून पोटापाण्याला लावले जाते.**

गोंदिया शहरात १९८५ पासून आदिवासी वसतिगृहासाठी चार इमारती भाड्याने घेतल्या. तेव्हापासून त्याच इमारतीतून वसतिगृहाचा कारभार सुरु आहे. वसतिगृहाच्या ईमारतीसाठी आवश्यक असणारी मोठी शासकीय जागा उपलब्ध आहे. तरीही वसतिगृहाच्या ईमारतीसाठी येथील लोकप्रतिनिधी प्रयत्न करत




### काय म्हणतात संघटना...

**गोंदिया जिल्हा मुख्यालयाच्या स्थापेनंतर तरी आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शासकीय जागेवर सर्व सुविधायुक्त वसतिगृह तयार होईल, अशी अपेक्षा होती. मात्र ती वांझोटी ठरली. १९८५ पासून वसतिगृहे भाड्याच्या इमारतीत आहेत. त्याठिकाणी वाचनालय,, क्रीडांगण आदींचा अभाव आहे. दरमहा मिळणारा निर्वाह भत्ता ६०० वरुन २५०० करण्यात यावा. प्रवेश ऑनलाईन ऐवजी, ऑफलाईन करण्यात यावे, डीबीटी बंद करुन वसतिगृहात जेवन देण्यात यावे अशी सर्वप्रथम शासनाने भाड्याच्या इमारतीऐवजी वसतिगृहाची इमारत तयार करुन द्यावी.**

**राहूल येल्ले, जिल्हाध्यक्ष, आदिवासी विद्यार्थी**

नसल्याचे दिसून येते. खोलीवजा, कोंदट आणि छोटेखानी इमारतीत विद्यार्थ्यांना राहावे लागत असल्याने त्याचा परिणाम त्यांच्या अभ्यास आणि मानसिकतेवर होत आहे. या वसतिगृहात राहून आपली कुचंबनाच होत असल्याचा आरोप विद्यार्थ्यांचा आहे.

# महामार्गावरील खड्डयात "बेसरम" वृक्ष लावून नोंदविला निषेध

**सडक-अर्जुनी :** तालुक्याच्या सौंदड येथून नागपुर – रायपुर महामार्ग गेलेला आहे. या महामार्गावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहन चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. खड्डा चुकविण्याच्या नादात अपघात घडत आहेत. या खड्यामुळे अनेकांचा जीव गेला, पण विभागाची झोप उघडली नाही.

रस्ता दुरूस्तीकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने दिवसेंदिवस महामार्गावरील खड्डे घातक ठरू लागले आहेत. या प्रकाराला संतापून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या वतीने सौंदड येथे महामार्गावरील खड्ड्यात बेशरम वृक्षाची लागवड करून आंदोलन करण्यात आले. प्रशासनाच्या दुर्लक्ष धोरणा निषेध नोंदवून आक्रोश व्यक्त करण्यात आला.



सडक अर्जुनी तालुक्यातून रायपूर-नागपूर हा राष्ट्रीय महामार्ग गेलेला आहे. महामार्गावरील सौंदड गावशिवारात रस्ता अत्यंत जर्जर आणि धोकादायक झाला आहे. महामार्गावर पावसामुळे ठीक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यात पाणी साचून राहत असल्याने वाहन धारकांना अंदाज येत नाही. परिणामी अपघात घडून येत आहे. दररोज एक ना एक अपघात होत आहेत. या अपघाताच्या मालिकेत आतापर्यंत अनेकांना आपला जीव द्यावा लागला आहे. त्यामुळे हा महामार्ग मृत्यूचा महामार्ग म्हणून नावारूपास येऊ लागला आहे. असे असूनही सार्वजनिक बांधकाम विभाग व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण लक्ष देताना दिसून येत नाही. परिणामी रस्ता हा नागरिकांच्या जीवावर उठला आहे.

या संदर्भात अनेकदा पत्र व्यवहार करण्यात आले. परंतु, रस्ता दुरूस्तीला घेवून प्रशासन झोपेचे सोंग करीत आहेत. या बाबीला संतापून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या वतीने महामार्गावरील खड्ड्यात बेशरम वृक्षाची लागवड करून शासन, प्रशासनाच्या कृतीचा निषेध नोंदविण्यात आला. आंदोलन करीत रस्ता दुरूस्त करावा, अशा मागणीचे निवेदन जनप्रतिनिधी व यंत्रणेला देण्यात आला. जर यापुढेही विभागाकडून रस्ता दुरूस्तीला घेवून पुढाकार घेण्यात आला नाही तर महामार्गावर चक्काजाम आंदोलन करून महामार्गावरील वाहतूक बंद पाडणार, असा इशाराही देण्यात आला आहे.

या आंदोलनाचे नेतृत्व महिला जिल्हाध्यक्ष मंजू डोंगरवार, जिल्हा महासचिव बिसराम सलामे, जिल्हा सचिव महेंद्र निकोडे, तालुकाध्यक्ष विलास चकाटे यांनी केले. यावेळी महिला तालुकाध्यक्ष आरती जांगडे, अरुण आचले, मुकेश आचले, अखिल यावलकर, राकेश यावलकर, माधुरी फ्फाये, रूपचंद इरले, सतीश आचले, शारदा खेकरे, सूर्यवंशी, सादिक शेख, आय.एम.माहुर्ले, प्रीतम गोबाडे, नेहा साखरे, येशुकाबाई राऊत, अश्विनी यावलकर, चेतन यावलकर, हेमराज इरले, दुर्गेश राऊत, रोहित नंदरधने यांच्यासह कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# नाल्यावरील पुल खचल्याने "या" मार्गावरील वाहतुक बंद



**अर्जुनी-मोरगाव:** तालुक्यात मागील १३ ,१४ दिवसांपासुन सतत पाऊस पडत असल्याने संपूर्ण तालुका जलमय झाला. जमीन दलदल झाली. पावसामुळे अनेक रस्ते बंद आहेत त्यातच १ ऑगस्ट रोजी रात्रि १०:०० वाजताच्या सुमारास नवेगाव/बांध-गोठणगाव मार्गावरील गोठणगाव तलावाजवळील नाल्यावरील पूल खचल्याने गोठणगाव-नवेगावबांध मार्गावरील वाहतुक बंद करण्यात आली आहे.

यासाठी पर्यायी मार्ग म्हणुन नवेगावबांध वरुन गोठणगाव ला किंवा गोठणगाव वरुन नवेगावबांध ला जायचे असल्यास पर्यायी रस्ता कवठा किंवा खैरी-सुकळी मार्गाचा अवलंब करुन काळीमाती मार्गे या मार्गाचा नागरिकांनी वापर करावा असे आवाहन अर्जुनी-मोरगावचे उपविभागीय अधिकारी वरुणकुमार सहारे यांनी केले आहे. नाला खचल्याने यामुळे नागरिकांना अधिकचा अंतराचा प्रवास करीत गावी जावे लागते. सदर खचलेल्या नाल्यावरील पुलाचे बांधकाम लवकरात लवकर करुन गोठणगाव-नवेगावबांध मार्ग वाहतुकीसाठी सुरळीत करण्याची मागणी नागरिकांनी बांधकाम विभागाकडे केली आहे.

# विद्यार्थी जुन्याच गणवेशावर स्वातंत्र्य दिवस साजरा करणार?

**गोंदिया:** शाळा सुरु झाल्या व मुलांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. शाळेच्या पहील्याच दिवशी शालेय विद्यार्थ्यांना गणवेश देण्याचा शब्द देणाऱ्या शासनाने दिड महीना लोटला तरी गणवेश दिला नाही . परिणामी राज्यातील काही शाळा वगळता ६५ हजार शाळा मधील पहीली ते आठवी पर्यंतच्या ४४ लाख ६० हजार विद्यार्थ्यांना जुन्याच गणवेशावर स्वातंत्र्य दिवस साजरा करावा लागणार असल्याचे चित्र दिसत आहे.

राज्य शासनाने जि.प., न.प. तसेच शासकीय शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना गणवेश योजना सुरू करण्यात आली आहे. शैक्षणिक सत्र २०२४-२५ सुरू होवून दिड महिन्याचा काळ लोटत असूनही विद्यार्थ्यांना गणवेश मिळालेले नाही. त्यामुळे आम्हाला गणवेश कधी मिळणार असा प्रश्न विद्यार्थी शासनाला करीत आहेत. मोफत गणवेशाची आस लावुन असलेले चिमुकले मात्र आजघडीला जुन्याच गणवेशावर शाळेत जात आहेत, हे विशेष.



### ११० रुपये शिलाई खर्च,अनब ड्रेस कधी शिवणार?

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळेतील पहीली ते आठविच्या सर्व विद्यार्थ्यांना दोन गणवेश देण्याची योजना आहे.४ मार्च २०२४ ला विद्यार्थ्यांच्या मापानुसार कापड पुरविण्याचे कंत्राट देण्यात आले. महीला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून महीला बचत गटांनी प्रती गणवेश ११० रुपये शिलाई खर्च घेऊन शाळेच्या पहील्या दिवशी गणवेश देण्याचे ठरले.मात्र ११० रुपयात गणवेश शिवुन देण्याची मुख्य अडचण पुढे आली आहे. एकीकडे कापड आले असे सांगितले जात असले तरी ही शाळे पर्यंत कधी पोहचणार, अन कपडे विद्यार्थ्यांना कधी शिवुन मिळणार याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे.**

परंतु, गणवेशासाठी देण्यात आलेले कापड, शिलाई खर्च, टेंडर प्रकिया या सर्वांना घेवून अडचणी निर्माण झाल्याने गणवेश कुठे अडकले, हेच समजेनासे झाले आहे.

### अनेक शाळेत सुविधांचा अभाव

**शासनाकडून मोफत शिक्षणाचा दावा केला जात आहे. परंतु, ज्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना विद्यादानाचे कार्य सुरू आहे, त्यांची अवस्था बिकट झाली आहे. अनेक सरकारी शाळांच्या इमारती पडक्या आहेत. शौचालय, पिण्याच्या पाण्याची सोय, हैण्डवाश स्टेशन, पुरेसे बसण्याचे बाक नाही. इमारतीच्या स्लैब मधून पावसाचे पाणी गळत आहे, अशा भौतिक सोयी सुविधांच्या देखरेखीसाठी शाळांना पुरेसा निधी उपलब्ध होत नसतो.परिणामी सुविधांचा अभाव दिसून येतो. याकडे शासन, लोकप्रतिनिधींनी लक्ष देण्याची गरज आहे.**

### गरीब विद्यार्थ्यांची थट्टा

**गरीब व आर्थिक दुर्बल घटकातील बालकांना शिक्षण मिळावे, यासाठी अनेक योजना आहेत. परंतु, सदर योजनांचा लाभ वेळेवर मिळत नसल्याने त्यांची शासनाकडून थट्टा केली जात आहे. गणवेश योजना सुरू करण्यात आली. परंतु, विद्यार्थ्यांना अद्याप गणवेश मिळालेले नाही. तर ज्या शाळांमध्ये विद्यार्थी शिक्षण घेतात, त्या ठिकाणी भौतिका सोयी-सुविधांचा अभाव दिसून येतो. यामुळे शिक्षणात मुले रमणार कशी? असा प्रश्न पालकांना पडला असून शासनाने गरीबांची थट्टा थांबवावी, अशी मागणी केली जात आहे.**

खाजगी शाळेतील मुलांचे गणवेश बघून सरकारी शाळातील विद्यार्थ्यांचे मन कासाविस व अधीर झाले आहे. राज्य शासनाने "एक राज्य-एक गणवेश' हे धोरण निश्चित करून शैक्षणिक सत्र २०२४ २५ पासून विद्यार्थ्यांना मिळणारे दोन्ही गणवेश थेट विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी मिळतील, असे परिपत्रक काढले होते. परंतु, शैक्षणिक सत्राला दिड महिन्याचा काळ लोटूनही विद्यार्थ्यांना गणवेशाची प्रतिक्षाच लागून आहे. हे मात्र विशेष.

# थर्ड लाइनच्या कामामुळे तब्बल ७२ रेल्वेगाड्या रद्द

**गोंदिया:** दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वेच्या नागपूर मंडळाअंतर्गत राजनांदगाव ते कळमणा दरम्यान तिसऱ्या लाइनचे काम प्रगतिपथावर आहे. इलेक्ट्रॉनिक्स इंटरलॉगिगचे कार्य सुरु असल्यामुळे ४ ते १३ ऑगस्ट व नॉन लॉगिंकच्या कामामुळे १४ ते २० ऑगस्टपर्यंत १६ प्रवासी गाड्या व ५६ जलद रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. तर अनेक गाड्यांच्या मार्गात बदल करण्यात आला आहे.

राजनांदगाव ते कठमना या २२८ किमी अंतरावर तिसऱ्या लाइनचे निर्माण कार्य युद्ध पातळीवर सुरु आहे. या प्रगतिपथावर असलेल्या लोहमार्गाच्या इंटरलॉकिंग व नॉन ईंटरलॉकिंगच्या कामामुळे ४ ते २० ऑगस्टदरम्यान अनेक रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. याबाबत प्रवासांनी खबरदारी घ्यावी, असे आवाहन रेल्व प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### ७ ते १९ दरम्यान या रेल्वेगाड्या रद्द

**डोंगरगड-गोंदिया-डोंगरगड क्र.०८७११/१२, गाडी इतवारी मेमो गाडी क्र.०८७१३, इतवारी-गोंदिया मेमो गाडी क्र.०८७१६, इतवारी-रामटेक गाडी क्र.०८७५६, रामटेक-इतवारी गाडी क्र.०८७५१, इतवारी-रामटेक मेमो गाडी क्र.०८७५४/५५, इतवारी-तिरोडा मेमो गाडी क्र.०८२८१/८२, तिरोडी-तुमसर-तिरोडी गाडी क्र.०८२८३/८४, इतवारी-बालाघाट-इतवारी गाडी क्र.०८७१४/१५, रायपूर-इतवारी-रायपूर गाडी क्र.०८२६८/६७, कोरबा-इतवारी गाडी क्र.१८२३९, इतवारी-बिलासपूर-इतवारी गाडी क्र.१२८५६/५५, इतवारी-बिलासपूर गाडी क्र.१८२४०, टाटानगर गाडी क्र.१८१०९/१०, नागपूर-सहडोल-नागपूर गाडी क्र.११२०१/०२, हावडा-अहमदाबास-हावडा गाडी क्र.१२८३३/३४, हावडा-मुंबई गीतांतली गाडी क्र.१२८५९/६०, कोरबा-अमृतसर ही गाडी ४ ते ९ ऑगस्ट व १५ ऑगस्ट रोजी तर अमृतसर-बिलासपूर ही रेल्वेगाडी ६ ते ११ ऑगस्ट व १७ ऑगस्ट रोजी रद्द राहणार आहे. शालिमार गाडी क्र.१८०३०/२९ ही गाडी ११ ते १७ व १३ ते १९ ऑगस्टला रद्द राहणार आहे. याशिवाय अनेक रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. तर अनेक रेल्वे गाड्यांचा मार्ग बल्लारशा-गोंदिया या मार्गाने वळविण्यात आल्या आहेत.**



# अपर आयुक्त रविंद्र ठाकरे यांनी घेतला आदिवासी योजनांचा आढावा



**गोंदिया :-** आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त रविंद्र ठाकरे यांनी २२ ते २४ जुलै २०२४ दरम्यान एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय देवरी येथे भेट दिली. त्यांनी देवरी प्रकल्पांतर्गत समाविष्ठ असलेल्या ११ शासकीय आश्रमशाळांना भेटी देवून आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आढावा घेतला. यामध्ये राज्य शासनाने सुरू केलेल्या “मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना’ या महाराष्ट्र शासनाच्या योजनेची प्रचार व प्रसिध्दी करून एकही आदिवासी महिला या योजनेपासून वंचित राहू नये याकरिता आदिवासी विकास विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच आदिवासी बचत गटांना याचे महत्व पटवून दिले. तसेच जिल्ह्यातील शासकीय आश्रम शाळांना भेटी देवून या शैक्षणिक सत्राच्या सुरूवातीपासून हाती घेण्यात आलेले नविन उपक्रम उत्तम प्रकारे राबविण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

इंग्रजी भाषेत संभाषण, ब्राईटर माईड उपक्रमाव्दारे विद्यार्थ्यांची एकाग्रता शक्ती वाढविणे तसेच IIT, NEET, JEE परिक्षेचे नियोजन हे शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीपासून करीत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. उएढ च्या परीक्षेत भरघोस यश प्राप्त झाले असल्याचे तसेच या प्रकल्पामधील ३ आदिवासी विद्यार्थी CLAT परीक्षेत यश प्राप्त केल्याबाबत त्यांनी कौतुक केले. त्याचबरोबर शिष्यवृत्ती परीक्षा, प्रेरणादायी मार्गदर्शन सत्र प्रत्येक आठवड्यात घेणे. आदिवासी मुलांमध्ये इंग्रजी बोलण्याचे धाडस निर्माण व्हावे या उद्देशाने शाळेतील विद्यार्थ्यांना दररोज वेगवेगळ्या मुद्दयांवर इंग्रजी बोलण्यासाठी प्रवृत्त केले जाणार आहे. जेणेकरून बाहेरच्या ठिकाणी शिकायला गेल्यास त्यांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी निर्माण होवू नये. हा यामागील मुख्य उद्देश आहे. यासाठी सर्व अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न करण्याच्या सूचना अपर आयुक्तांकडून देण्यात आल्या.

देवरी प्रकल्पातील गोंडवाना सांस्कृतिक भवन देवरी व तहसिल कार्यालय सालेकसा या ठिकाणी सर्व आदिवासी महिला बचतगट, उमेद बचत गट, माविम बचत गट, CFR बचतगट यांचेकडून विविध तयार करण्यात आलेल्या विविध कलाकृती/साहित्यांना योग्य बाजारपेठ मिळण्यासाठी सर्वांनी एकत्र येवून विकास साधण्याचे प्रयत्न करण्यात यावे. सर्वात महत्वाचे म्हणजे या भागातील आदिवासी बांधव अनेक विषयात पारंगत आहेत, मात्र त्यांनी तयार केलेल्या साहित्याला बाजारपेठ उपलब्ध होत नसल्याने येथील नागरिकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्याकरिता आपण ट्रायबल्स बाजार नाव-ाचा एक ई-कॉमर्सचा प्लॅटफॉर्म तयार करून नागपूर येथे गोंदिया जिल्ह्याच्या बचत गटांच्या साहित्याचे एक मार्केट तयार करून देण्याचा आपला मुख्य उद्देश आहे असे त्यांनी सांगितले. सदर उपक्रमासोबत जुळून आदिवासी बचत गटांचा सर्वांगिण विकास साधण्याचे उपस्थित आदिवासी महिला बचत गटांना अपर आयुक्तांकडून आवाहन करण्यात आले. तसेच उपस्थित सर्व विविध शासकीय यंत्रणांचे अधिकारी, कर्मचारी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी आदिवासी विकासाकरीता प्रयत्न करण्याच्या सूचना अपर आयुक्तांकडून देण्यात आल्या.

आदिवासी विकास विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण व शहरी घरकुल योजना, केंद्रवर्ती अर्थसंकल्प अशा विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन प्रकल्प अधिकारी देवरी उमेश काशिद यांनी केले.

# विद्यार्थी कोचिंगमध्ये तरीही शाळेत हजेरी




**गोंदिया:-** वैद्यकीय, अभियांत्रिकी, आणि आयआयटी सारख्या क्षेत्रात प्रवेश मिळावा, यासाठी दहावीनंतर विद्यार्थी दाखविण्यापुरता एकरावी आणि बारावीत प्रवेश घेतात. १४ ते १६ तास कोचिंगमध्ये जातात. मग त्यांची हजेरी शाळांत लागतेच कशी? असा सवाल काँग्रेसतर्फे उपस्थित करण्यात आला आहे. अशा शाळा-महाविद्यालयांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन मंगळवारी (दि.३०) शिक्षणाधिकारी डॉ. महेंद्र गजभिये यांना देण्यात आले.

गोंदिया शहरात ५००० पेक्षा अधिक अकरावी बारावीचे विद्यार्थी खासगी कोचिंग क्लासेसमध्ये सकाळी पाच वाजेपासून, तर रात्रीच्या नऊ वाजेपर्यंत जवळपास १४ ते १६ तास सतत शिक्षण घेतात. तर या विद्यार्थ्यांची हजेरी शाळेत कशी काय लागते? हा मोठा प्रश्न आहे. राज्य सरकारच्या नियमाप्रमाणे वर्गात ८० टक्के पेक्षा अधिक हजेरी असल्यावच परीक्षेत बसू दिले जाते. गोंदिया शहरामध्ये मोठ्या-मोठ्या कोचिंग क्लासेस आहेत. कोचिंगमध्ये जागा नसूनही एका वर्गात वीस विद्यार्थ्यांची जागा असल्यावर ६०-७० विद्यार्थ्यांना बसवले जाते. असे असूनही पालकांकडून दीड लाखाच्यावर शुल्क आकारले जाते. त्याचप्रमाणे कोचिंग क्लासेसच्या प्रसिद्धीसाठी जिकडेतिकडे मोठ्या-मोठ्या होर्डिंग लावल्या जात आहेत. हे होर्डिंग देखील धोकादायक ठरत आहेत. मुंबईच्या घाटकोपर मध्ये दुर्घटना घडून आली, अशी घटना आपल्या शहरात घडू नये, यासाठी यांच्या होर्डिंग वरही नियंत्रण लावणे खूप गरजेचे आहे. आपल्या गोंदिया शहरात परराज्यातील विद्यार्थीही खाजगी कोचिंग क्लासेसमध्ये शिक्षण घेण्यासाठी मोठ्या संख्येने आले आहेत. यांची सुरक्षिततेची जबाबदारी ही प्रशासनाची आहे. त्यासाठी खाजगी कोचिंगमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची सविस्तर माहिती शिक्षण विभागासह पोलिस विभागाकडे असणे अनिवार्य आहे.

बोगस नोंदणी करणाऱ्या शााळांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शिक्षणाधिकारी महेंद्र गजभिये यांना देण्यात आलेल्या निवेदनातून काँग्रेसच्यावतीने करण्यात आली आहे. निवेदन देणाऱ्यांमध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक जीव ठाकरेले, उपसभापती अनिल दहिवले, बिराजदार पटले, तुफान बघेले, रंजीत मेश्राम, पंकज चिखलोंडे, रोहित दमाहे, अश्विन उपवंशी, कार्तिक चौधरी आदिंचा समावेश होता.

# गोठणगाव येथे लोकार्पण, सत्कार सोहळा व आरोग्य शीबीर संपन्न



**अर्जुनी मोरगाव:-** गोंदिया जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा सभापती शिक्षण क्रीडा व आरोग्य इंजि यशवंत गणविर व मित्र परिवाराच्या वतीने आयोजित लोकार्पण, सत्कार सोहळा व आर-ोग्य शीबीर ला क्षेत्रातील जनतेने चांगला प्रतिसाद दिला.अतिदुर्गम आदिवासी बहुल व नक्षलग्रस्त डोंगराळ भागात वसलेला क्षेत्र म्हणून गोठणगाव जिल्हा परिषद क्षेत्राची ओळख आहे.

गोठणगाव जिल्हा परिषद क्षेत्राचा विकास करण्यासाठी इंजि यशवंत गणविर यांनी कोट्यावधी रुपयांची निधी उपलब्ध करून दिली आणि क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील आ-हेत. आजपर्यंत बरेच जिल्हा परिषद सदस्य झाले, पदाधिकारी होऊन गेले परंतु उपाध्यक्ष पद-ावर काम करताना यशवंत गणविर यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली.असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून गोठणगाव जिल्हा परिषद क्षेत्रांतर्गत येणाऱ्या सर्व ग्रामपंचायत सरपंच व सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.त्याचप्रमाणे शितशवपेटी व सकुली (तिरडी) चे वाटप करण्यात आले. गोठणगाव येथील वार्ड क्रं २ मधील अंगणवाडी इमारतीचे लोकार्पण करण्यात आले.अंगणवाडी मधे उत्कृष्ट कार्य करणाऱ्या सेविका व मदतनीस यांचा सत्कार करण्यात आला.गावात उत्कृष्ट आरोग्य सेवा देणाऱ्या आशा सेविका व प्राथमिक आरोग्य केंद्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या परीचारीकेचा सत्कार करण्यात आला आहे.यामध्ये सरपंच संजय ईश्वार, गणेश ताराम, पुष्पाताई डोंगरवार, नरेंद्र लोथे, दयाराम लंजे, बळीराम टेंभुर्णे, पपिताताई नंदेश्वर, करणदास रक्षा व साम ाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांमधे रतिराम राणे माजी जि.प.सदस्य, दिनदयाल डोंगरवार माजी पं.स.सदस्य, दिलीप तिरपुडे, तुषार बनपुरकर, सौरभ पशिने, तेजराम राउत, सदाशिव घुगुसकार, जागेश्वर मते, कलिराम काटेंगे, भिम राव नंदेश्वर, रवींद्र नाईक, पुरुषोत्तम कोरे,प्रेमलाल नागपुरे, क्रिष्णा मांडवे, हरिश्चंद्र घरतकर, हेमराज मेश्राम, विशाखा लोथे, भरत गजा-पुरे, अशोक सरकार, श्रीनिवास चक्रवर्ती, सुभाष तिरगम,सिताराम वलके, नितेश कुंभरे, विश्वेश्वर कांबळे, सुखदेव कनोजे,गोपाल नंदेश्वर, ताराचंद ठवरे, दिलीप खोब्रागडे यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष लोकपाल गहाणे यांच्या शुभहस्ते व आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांच्या अध्यक्षतेखाली, राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष किशोर तरोणे, युवक राकापा विधानसभा अध्यक्ष योगेश नाकाडे, युवक राकापा तालुकाध्यक्ष किशोर ब्राह्मणकर, महिला राकापा तालुकाध्यक्ष सुशिला हलमारे, पं.स.सदस्य आम्रपाली डोंगरवार,युवती तालुकाध्यक्ष हर्षा राउत, संजय ईश्वार सरपंच गोठणगाव, उपसरपंच कांतीलाल डोंगरवार, आदिवासी विविध सह.संस्था अध्यक्ष रवींद्र घरतकर, उपाध्यक्ष रघुनाथ मेश्राम, माजी जि.प.सदस्य रतिराम राणे,दानेश साखरे नगरसेवक अर्जुनी मोरगाव, राजेंद्र जांभुळकर, उद्धव मेहंदळे, ग्रामपंचायत सदस्य रतिराम कोडापे,दिपक राणे,मनोज रामटेके, कविता परतेकी,सुनंदा काटेंगे, रीना राणे सर्व ग्रामपंचायत सरपंच व क्षेत्रातील मान्यवर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी विद्युत तार चोरी करणाऱ्या टोळीस अटक

**गोंदिया/अर्जुनी मोरगाव :** - विद्युत तार चोरी प्रकरणात अर्जुनी/मोरगाव (Arjuni Police) पोलीसांनी सहा आरोपींच्या टोळीस ताब्यात घेवुन गुन्ह्यात वापरलेल्या ३ वाहनांसह एकुण १४ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. प्राप्त माहितीनुसार दि.२८ आक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२३ दरम्यान अर्जुनी/मोरगाव तालुक्यातील डोंगरगाव ते घुसोबाटोला येथील १९ विद्युत खांबावरील विद्युत तार ३४२० मीटर लांब किंमत ६० हजार रुपए तसेच डोंगरगाव ते अर्जुनी ते नवेगावबांध पर्यंत चे १६ खांबावरील विद्युत तार ३३ के.व्ही २८८० मीटर लांबीचे किंमत ५० हजार रुपये असा एकुण एक लाख दहा हजार रुपयाचा माल कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरुन नेले, अशा तक्रारी वरुन पो-लीस स्टेशन अर्जुनी मोरगाव येथे अपराध क्रमांक ३१३/२०२३ कलम ३७९ भा.दं.वि अन्वये (Arjuni Crime) गुन्हा दाखल करण्यात करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा तपास सुरु असतांनाच दि.२१ मे ते २४ मे २०२४ दरम्यान मौजा सोमलपुर ते गुढरी येथील २३ खांबांवरील विद्युत तार ११ के.व्ही २७०० मीटर लांबी किंमत ६० हजार रुपयाचा मुद्देमाल चोरी झाल्याच्या तक्रारी वरुन अपराध क्रमांक १६९/२०२४ कलम ३७९ भा.दं.वि अन्वये गुन्हा दाखल करुन पोलीसांनी तपास सुरु केला.



सदर तपासाच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक कमलेश सोनटक्के यांच्या निर्देशानुसार (Arjuni Police) पोलीसांनी शोधमोहीम सुरु करुन त्यांच्या सुत्रांच्या व तंत्रज्ञानाचा वापर करुन पुरावे जमा केले. सदर पुराव्याच्या आधारे आरोपी क्रमांक १) सचिन कठनकर रा.साकोली, २) तुषार लांजेवार रा.निलज, ३) परवेज अगवान रा.आमगाव/बु,४) दिपरत्न उनके रा.पळसगाव/सोनका, ५) निखिल मडावी रा.सानगडी आणि ६) आनंदराव निर्वान रा.सौंदड यांना ताब्यात घेवुन त्यांची कसुन चौकशी केली असता त्यांनी गुन्हा केले असल्याचे कबुल केले.

सदर आरोपींनी चोरलेला सर्व मुद्देमाल हा भंडारा येथील कबाडी दुकानदाराकडे विक्री केला होता. सदर माल हा वितळवलेल्या ॲल्युमिनियमच्या प्लेट्स व चुरा असलेला २८५ किलो किंमत १७ हजार रुपयाचा मुद्देमाल व गुन्ह्यात वापरलेले तीन वाहन महिंद्रा कंपनीची झायलो गाडी क्रमांक एम.एच ४८ ए २७४३ किंमत २ लाख पंच्याहत्तर हजार रुपये,टाटा कंपनीची इंद्दा गाडी क्रमांक एम.एच ३४ एव्ही १३२० किंमत ४६ हजार रुपये आणि महिंदा कंपनीचा पिकअप गाडी क्रमांक एम.एच ३५ एजे २३०३ किंमत ५९ हजार रुपये असा एकुण १४ लाख ९५ हजार रुपये चा मुद्देमाल आरोपींकडुन हस्तगत करण्यात आला.

पाच आरोपी (Arjuni Police) पोलीस कोठडीत असुन सदर गुन्ह्याचा तपास जिल्हा पोलीस अधिक्षक निखिल पिंगळे,अपर पोलीस अधिक्षक नित्यानंद झा, देवरीचे उपविभागीय पोलीस अधिकारी विवेक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अर्जुनी/मोरगाव पोलीस स्टेशन चे ठाणेदार पोलीस निरीक्षक कमलेश सोनटक्के, पोउनि. किरण मेश्राम, पो.हवा.रोशन गोंडाने, रमेश सेलोकर, बापु येरणे,महेंद्र पुन्यप्रेड्डीवार, पो.शि.गिरीश लांजेवार, लोकेश कोसरे, तिलक पर्वते, श्रीहरी कोरे व आंदींनी केला असुन कार्रवाई केली आहे.

# ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी गौरव सप्ताहाचे आयोजन

**गोंदिया:-** आदिवासी समाजाचे सांस्कृतिक वेगळे-पणा, मानवतेबद्दल असिम श्रध्दा, निसर्गावर अतुलनीय प्रेम, प्रामाणिकपणाचे अत्युच्च टोक या पारंपारिक निखळ गुणांचा गौरव म्हणून दरवर्षी जागतिक स्तरावर ९ ऑगस्ट हा दिवस जागतिक आदिवासी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. भारतातील समग्र आदिवासी समाजासाठी अस्मितेचा व आत्मसन्मानाचा हा दिवस आहे. केवळ भारतातच नाही तर जगाच्या सर्व भागात आदिवासी समाजाचे लोक मूळ निवासी म्हणून राहतात. त्यांची जीवनशैली, खाण्यापिण्याच्या सवयी, चालिरीती इत्यादी सामान्य लोकांपेक्षा भिन्न असतात. त्यांच्या शैक्षणिक सामाजिक उन्नतीसाठी आणि त्यांची संस्कृती जपण्यासाठी अनेक प्रकारचे कार्यक्रम शासनामाफर्फत राबविले जातात.

या अनुसूचित जमातीचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी त्यांची संस्कृती जतन करण्यासाठी आदिवासी दिन साजरा केला जातो. या निमित्ताने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प दे-वरी अंतर्गत ९ ऑगस्ट २०२४ जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी गौरव सप्ताह आयोजित केला आहे.

या कार्यक्रमाअंतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी व आपली संस्कृती, कलाकौशल्य जपण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार ३ ऑगस्टला आश्रमशाळा व प्रकल्प स्तर वकृत्व स्पर्धा, ५ ऑगस्टला आश्रमशाळा व प्रकल्प स्तर चित्रकला स्पर्धा, ६ ऑगस्टला वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी वादविवाद स्पर्धा, ७ ऑगस्ट पासून ते तदनंतर निरंतर मुरकुडोह व इतर अतिदुर्गम ठिकाणी विविध शासकीय दाखले व योजनांचे शिबीर आयोजन, ८ ऑगस्टला आदिवासी समुदायाच्या विद्यार्थ्यांसाठी देवरी येथे बक्षिसात्मक स्पर्धा परिक्षा, ९ ऑगस्टला जागतिक आदिवासी दिनानिमीत्त प्रभात फेरी व कार्यालयीन कर्मचाऱ्यांमार्फत सर्वांसाठी रक्तदान शिबीराचे आयोजन. घरबसल्या आदिवासी समुदायाच्या लोकांना शासकीय योजना समजाव्यात यासाठी तयार केलेल्या Mobile App लोकार्पण. स्पर्धांमधील पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ. तरी आदिवासी गौरव सप्ताह निमित्ताने जिल्हयातील सर्व आदिवासी विद्यार्थी/विद्यार्थीनींसाठी आयोजित स्पर्धांमध्ये व रक्तदान शिबीर व प्रभात फ्फेरीमध्ये आपण सहभागी व्हावे, असे अवाहन प्रकल्प अधिकारी उमेश काशिद यांनी केले आहे.

# हिरडामाली येथे आरोग्य निदान शिबीर,६९८ लोकांची तपासणी

**गोरेगाव:-** तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र सोनी अंतर्गत हिरडामाली येथे शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा परिषद आरोग्य विभागामार्फ्फत आरोग्य निदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. शिबीरादरम्यान गावातील ६९८ लोकांनी आरोग्य शिबीराचा लाभ घेतल्याचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विनोद चव्हाण यांनी माहीती दिली आहे.शिबीरा दरम्यान मधुमेह, रक्तदाब, हिव-ताप, क्षयरोग, सिकलसेल ई.विविध आजाराबाबत तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. तसेच सोबत जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळेतील मुलांचे सिकलसेल तप-ासणी करण्यात आली. शासकिय वैद्यकीय महाविद्यालय तपासणी चमुमध्ये डॉ.आंभिलकर, डॉ.मेश्राम, डॉ.डोंगरे व डॉ.अनंत चांदेकर यांचेसह एम.बी.बी.एस.प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

प्राथमिक आरोग्य केंद्र सोनी येथील समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.आशिष मेश्राम,डॉ.सोनल बिसेन, डॉ.पामेंद्र तुरकर, डॉ.संजय रहांगडाले, डॉ.मनिष कटरे सोबत आरोग्य सेविका मंजुटे, घासले व बोरकर तर आरोग्य सेवक हरिणखेडे व नागपुरे यांनी आरोग्य सेवा दिली. यावेळी गोरेगाव तालुका आरोग्य अधिकारी डॉ.विनोद चव्हाण व प्राथमिक आरोग्य केंद्र सोन-ीचे वैद्यकीय अधिकारी डॉ.कुलदीप बघेले सुद्धा उपस्थित होते.यावेळी शासकिय वैद्यकीय महाविद्यालय चमुमार्फ्फत अवयवदानाबाबत कलापथकाच्या माध्यमातुन जनजागृती करण्यात आली.




# कायदेविषयक जनजागृती साक्षरता शिबीर



**गोंदिया:-** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा वकील संघ गोंदिया यांच्या विद्यमाने २९ जुलै २०२४ रोजी ङ्गमानसिक आजारी आणि मानसिकदृष्ट्यता अक्षम व्यक्तींना कायदेशीर सेवा योजना २०१६फ निमीत्त स्वीकार स्पेशल एज्युकेशन सेंटर फ्फॉर एम.आर.चिल्ड्रन निवासी स्कुल, गोंदिया येथे कायदेविषयक जनजागृती साक्षरता शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव एन.के.वाळके, ॲड. सुजाता तिवारी, मिलिंद बांबोडे, ॲड. नरेश शेन्डे, ॲड. हरिणखेडे उपस्थित होते.

मिलिंद बांबोडे यांनी सांगितले की, स्वीकार स्पेशल एज्युकेशन सेंटर फ्फॉर एम.आर. चिल्ड्रन निवासी स्कुल गोंदिया ही शाळा सन २००० पासून कार्यरत असून ७५ विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेत आहेत. सुजाता तिवारी यांनी मानसिक अवसादाचे उपचार, कायदेशीर अधिकार व मानसिक स्वास्थ काळजी अधिनियम २०१७ बाबत माहिती दिली व आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत मानसिक रोगी यांना पाच लाख अनुदान मिळतो असे सांगितले. एन.के.वाळके यांनी मानसिक रुग्णांना मिळणारे फ्फायदे व सोयी सवलती याबद्दल माहिती दिली व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण गोंदिया मानसिक आज-ारी आणि मानसिकदृष्ट्यता अक्षम व्यक्तींना मोफ्फत उपचार सेवा देण्याकरीता मदत करणार असे सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण गोंदिया येथील कर्मचारी पी.बी. अनकर, ए.एम. गजापुरे, एस.एम. कठाणे, पी.एन. गजभिये, एस.डी. गेडाम, पी.डी. जेंगठे, के.एस.चौरे, एल.ए. दर्वे, आलेशान मेश्राम, बी.डब्ल्यु. पारधी, आर.ए.मेंढे, सरतिमा भगत यांनी मोलाचे सहकार्य केले.

# संविधान चौकातून जय ओबीसीच्या गजरात निघाली मंडल यात्रा



## आज गोंदियात होणार समारोप

**नागपूर:** ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसी विद्यार्थ्यांना “मंडल आयोगाबाबत जागृती करीत त्यांना त्यांचे अधिकार आणि हक्क समजावून सांगण्यासाठी मंडल दिनानिमित्त विदर्भातील सात जिल्ह्यात काढण्यात आलेल्या मंडल यात्रेला ३ आँगस्टरोजी नागपूरातील सविंधान चौकातून शुभारंभ करण्यात आले. या मंडल यात्रेला सविंधान चौकात नागेश चौधरी, माजी मंत्री सुनिल केदार,आमदार अभिजित वंजारी, रमेश पिसे संजय शेंडे, डॉ अंजली साळवे, गिरिश पांडव,अनिल डहाके, सतिश मालेकर, दिनानाथ वाघमारे, मुकुंद आदेवर कृष्णाजी बेले, वंदना वनकर, सामाजिक कार्यकर्ते पियुष आकरे,कृतल आकरे, धिरज भिसीकर, संजु भुरे आदी मान्यवर उपस्थित होते.

संविधान चौकातील भार-तरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. मंडल यात्रेच्या शुभारंभप्रसंगी उपस्थित लोकप्रतिनिधीनी ओबीसींच्या जनजागृतीसाठी काढण्यात आलेल्या यात्रेला शुभेच्छा देत ओबीसी जनगणनेसाठी सर्वांनीच आपली शक्ती पणाला लावण्याची गरज असल्याचे विचार व्यक्त केले.तसेच या मंडल यात्रेच्या माध्यमातून ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी युवकांना विविध योजनांची माहिती मिळणार असल्याबद्दल आयोजकांचे आभार मानले.

या मंडल यात्रेसोबत यात्रेचे आयोजक ओबीसी युवा अधिकार मंचचे सयोंजक उमेश कोरराम, संघर्ष वाहिनीचे दिनानाथ वाघमारे,प्रा अनिल डहाके, मुकुंद आडेवार, वंदना वनकर, धिरज भिसीकर, संजु भुरे, रमेश पिसे आदी मान्यवर आहेत.

ओबीसी व्हीजेएनटी, एसबीसी समाजातील विविध प्रश्न आणि त्यावरील उपायावर चर्चा, विद्यार्थी, युवक, अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये जागृती, ओबीसींचे वसतिगृह, महाज्योती आणि ओबीसी आर्थिक विकास महामंळाच्या योजना, शिष्यवृत्तीचा लाभ, ओबीसींची जनगणना तसेच यात्रेच्या माध्यमातून ओबीसी हितासाठी गठित बी.पी. मंडल आयोगाच्या शिफारशींची माहिती ओबीसी समाजाला देऊन या शिफ ारशी शासनाने लागू करण्याची आवश्यकता या विषयावर जनजागृती करण्यात येणार आहे. ही यात्रा नागपूर, वर्धा, यवतमाळ चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा जिल्ह्यातून ७ आँगस्टला गोंदिया जिल्ह्यात दाखल होणार आहे.




या यात्रेच्या यशस्वीतेसाठी ओबीसी युवा अधिकार मंच, ओबीसी अधिकार मंच, संघर्ष वाहिनी, ओबीसी संघर्ष कृती समिती, ओबीसी सेवा संघ,संविधान मंच, स्टुडटंस राईटस असो. सेल्परिसपेक्ट म ुव्हमेंट, भोयर पवार महासंघ, सर्व समाज ओबीसी मंच, ओबीसी अधिकारी कर्मचारी महासंघ, ओबीसी विद्यार्थी संघटना, भटके विमुक्त परिषद, आता लढूया एकीनेच सारख्या अन्य बहुजन ओबीसी संघटनां प्रयत्न करीत आहेत.